डॉ. यशवंत मनोहर



महाबुद्ध डॉ. आंबेडकर

महाबुद्ध : डॉ. आंबेडकर

डॉ. यशवंत मनोहर

"... ज्ञान कधीही पूर्णत्वाला पोचू शकत नसते. आज परिपूर्ण ज्ञानाचे अंग किंवा शाखा भविष्यकाळात अपूर्ण वाटणारच कारण दिवसागणिक त्यात वाढ होत असते."

- डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८.३.४४३)

"आजचे हे युग विचाराचे युग आहे. कोणीही कसलेही थोतांड रचले तरी ते थोतांड आहे हे तुम्हाला ओळखता आले पाहिजे." - डॉ. भी.रा. आंबेडकर (१८.३.३६४)

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर-४४००२२

महाबुद्ध : डॉ. आंबेडकर
- डॉ. यशवंत मनोहर

प्रकाशक :
नितीन धनराज हनवते
युगसाक्षी प्रकाशन
त्रिमूर्तीनगर, रिंग रोड, नागपूर-२२
मो. ९८२२७००३२२

© डॉ. पुष्पलता यशवंत मनोहर
'लुम्बिनी', ४५ लोकसेवा नगर,
नागपूर-२२

प्रथमावृत्ती :
१४ ऑक्टोबर २००६

संगणकीय अक्षरजुळवणी :
मिलिंद मानकर,
डी-४, मणी ले आऊट,
गोपाल नगर,
नागपूर-२२

मुद्रक :
रेणुका प्रिन्टर्स,
अभ्यंकर नगर, नागपूर

मुखपृष्ठ :
भाऊ दांडडे, पठाण ले आऊट,
नागपूर

किंमत रु. २०/-

लेखकाचे निवेदन

'महाबुद्ध : डॉ. आंबेडकर' ही पुस्तिका वाचकांच्या हाती ठेवताना मला विशेष आनंद वाटतो आहे. या पुस्तिकेच्या शीर्षकामागील प्रमेय नवीन आहे. पण वाचकांनी ते जरा गंभीरपणे समजावून घ्यावे असे मला वाटते आणि माझ्या साहित्यावर अपार प्रेम करणारा माझा प्रिय वाचकवर्ग हे सर्वच जबाबदारीने समजावून घेईल ही खात्री मला आहे.

'महाबुद्ध : डॉ. आंबेडकर' या मुख्य लेखासोबत 'बुद्ध आणि आंबेडकर' हा लेख आणि धम्माशी संबंधित इतरही छोटे छोटे लेख या पुस्तिकेत प्रथमच प्रकाशित होत आहेत. या लेखांमधील ही माझी भूमिका वाचकांना विचारप्रवृत्त करील असे मला नम्रपणे वाटते.

युगसाक्षी प्रकाशनाने ही पुस्तिका आवर्जून प्रकाशित केल्याबद्दल प्रकाशकाला मी मनापासून धन्यवाद देतो.

नागपूर :

१४ ऑक्टोबर २००६

- यशवंत मनोहर

अनुक्रमणिका ...

लेखकाचे मनोगत –

१.	महाबुद्ध : डॉ. आंबेडकर	५
२.	धम्म : भारतीय संविधानाचा प्राण	१५
३.	करुणाच जगाला जगवेल	२०
४.	आंबेडकरनिष्ठा प्रश्नांकित होण्याचे प्रसंग	२४
५.	आदर्श बौद्धत्व : एक सौंदर्यसोहळा	२८
६.	अत्तदीपत्वाची कार्यशाळा	३१
७.	दीक्षाभूमी : माणुसकीचे विद्यापीठ	३३
८.	बुद्ध आणि आंबेडकर	३७

१

महाबुद्ध : डॉ. आंबेडकर

बोधी म्हणजे ज्ञान. ज्याला बोधी प्राप्त झाली तो बुद्ध ! याचा अर्थ ज्ञानी होणे म्हणजे बुद्ध होणे. ज्ञानी होण्याचे तीन अर्थ आहेत. इतरांनी निर्माण केलेले आणि अवतीभोवती विद्यमान असलेले ज्ञान आपलेसे करणे म्हणजे ज्ञानी होणेच होय. ज्ञानी असण्याचा हा पहिला प्रकार झाला. असे ज्ञान मिळविण्याने माणूस उपलब्ध ज्ञानाची माहिती करून घेतो. ज्ञानाच्या क्षेत्रात परस्परविरोधी मतप्रवाह असतात. काही लोक या वेगवेगळ्या मतप्रवाहांची माहिती निष्ठापूर्वक आपलीशी करतात. अशा विपुल माहितीचा साठा करणे महत्त्वाचे असतेच. असा ज्ञानसंग्रह असणारी व्यक्ती उपलब्ध ज्ञानाची संग्राहक या अर्थाने ज्ञानी असते. दुसऱ्या प्रकारच्या काही व्यक्ती उपलब्ध ज्ञानाची वर्गीय मांडणी करतात. उपलब्ध ज्ञानाचे दोन छावण्यांमध्ये व्यवस्थापन करतात आणि त्यातील एका छावणीची भूमिका प्रमाण मानतात. माहिती मिळविणे या पहिल्या पातळीवरच्या प्रक्रियेपेक्षा भूमिका घेणे ही पुढली पायरी असते. इथे ज्ञानाच्या तपासणीचा, चिकित्सेचा प्रारंभ होतो. इथे खरे म्हणजे ज्ञानमीमांसा सुरू होते. ज्ञानक्षेत्रातील अनिष्ट नाकारण्याला आणि इष्ट स्वीकारण्याला महत्त्व प्राप्त होते. ज्ञानाच्या उपकारकतेचे आणि विधायकतेचे मुद्दे पुढे येतात आणि इथून निष्ठेचे मुद्दे सुरू होतात. तर्कप्रामाण्य आणि शब्दप्रामाण्य अशा निष्ठांच्या दोन वाटा निर्माण होतात. मग इथे ही किंवा ती भूमिका अंगिकारिली जाते. ज्ञानक्षेत्रात अशा व्यक्तींमुळे संघर्षाला प्रारंभ होतो. तत्त्वज्ञानातील वैचारिक युद्ध सुरू होते. हे व्हावे लागते.

हेही खरे. तेही खरे. या बाळबोध अवस्थेतून मानवी मन बाहेर यावे लागते. प्रमाणकांची, प्रमाणमूल्यांची लढाई सुरू व्हावी लागते. या प्रक्रियेतच ज्ञानाला नवी पालवी येत जाते. तसूतसू का होईना ज्ञान पुढे सरकत जाते. ज्ञानाच्या विकासाची दारे उघडली जातात.

ज्ञानी होण्याचा सगळ्यात महत्त्वाचा प्रकार याहून वेगळाच असतो. आदर्श माणूस कसा असावा ? आदर्श समाज कसा असावा आणि आदर्श मानवी दुनिया कशी असावी यासंबंधीचे एखादे नवे आणि विधायक स्पष्टीकरण, दुनियेच्या तोवरच्या ज्ञानाला दुरुस्त करणारे आणि ज्ञानाची महत्ता वाढवणारे, ज्ञान पुढे नेणारे एखादे सम्यक् स्पष्टीकरण एखाद्या प्रज्ञावंताला सुचते तेव्हा हा ज्ञानवंत

मागल्या ज्ञानी माणसांपेक्षा वेगळा ठरतो. आधीचे दोन प्रकारचे ज्ञानी ज्ञान पुढे नेऊ शकत नसतात. ते ज्ञानाचा आलेख अधिक उंचावर नेत नसतात. या ज्ञानी लोकांच्यामुळे ज्ञान आहे त्या ठिकाणाहून पुढच्या प्रवासाला निघत नसते. हे आधीचे दोन प्रकारचे ज्ञानी आहे त्या ज्ञानाच्या चौकटीतच खेळ मांडत असतात. ही माणसे ज्ञानमित्र असतात. ज्ञानबंधू असतात पण ज्ञानपिता नसतात. तिसऱ्या प्रकारच्या प्रज्ञावंतांच्या पोटी ज्ञान जन्माला येत असते. ते ज्ञानाचे जनक असतात.

आणखी एक : पहिल्या दोन प्रकारचे लोक ज्ञानाचे उपासक असतात. ज्ञानाचे पाईक असतात. पुरस्कर्ते असतात. हे यांना करता यावे यासाठी कोणीतरी ज्ञान जन्माला घालावे लागते. ज्ञान जन्माला घालणाऱ्या अशा लोकांना ज्ञानी म्हटले जाते. ज्ञानवंत म्हटले जाते. असे ज्ञान ज्यांना जन्माला घालता येते ती माणसे मानवी समाजात कमीच असतात. बुद्ध अशा थोड्या ज्ञानवंतांपैकी एक आदरणीय ज्ञानवंत होता. त्याला 'बोधी' प्राप्त झाली होती. नव्या ज्ञानाचा सोन्याच्या हंडा त्याच्या हाती लागला होता.

बुद्ध माणूसच होता. तो माणसांमधलाच एक महान बुद्धिमान माणूस होता. तो बुद्धिवादी होता. सगळ्या दुनियेच्या दुःखानी व्याकूळ होणारा करुणेचा सागर तो होता. बुद्धीला पटले नाही ते त्याने प्रमाण मानले नाही. कल्पनांच्या अंधश्रद्ध भराऱ्या त्याने मानवी कल्याणाच्या संदर्भात अहितकारी ठरवल्या. त्याने माणूसच आपल्या चिंतनाचा एकमेव विषय मानला. त्याने फक्त माणसांच्या हिताच्या कृती प्रमाण मानल्या. त्याने केवळ माणसाच्या ऐहिक जीवनाच्या हितासाठी शब्द वापरले.

माणसाला गुंगवणाऱ्या, माणसाला फसवणाऱ्या आणि माणसाच्या उज्ज्वलतेच्या आणि समतेच्या मार्गात अडथळे निर्माण करणाऱ्या ईश्वर, आत्मा, परलोक अशा सर्वच गोष्टी त्याने मानवी मनातूनच काढून टाकण्याचा कार्यक्रम राबवला. बुद्धाने माणसाच्या ऐहिक जीवनालाच एकमेव विषय मानले. या ऐहिक जीवनाच्याच सौंदर्याचे चिंतन त्याने मांडले. आपण त्याला बुद्ध म्हणतो त्याचे हे कारण आहे.

बुद्ध माणूसच होता. त्याला कोणी ईश्वरही म्हणू नये. भगवानही म्हणू नये. महात्माही म्हणू नये. तो कोणाचा अवतार आहे हे सांगून लोकांना फसवू नये आणि त्याने कोणता अवतार घेतला हे सांगून मानवी बुद्धीचा आणि बुद्धिवादी बुद्धाचा अवमान करू नये.

महायान पंथाने पुढे कधीतरी बुद्ध जन्माला येईल अशी कल्पना मांडली होती. या बुद्धाचे नाव मैत्रेय बुद्ध असेल असेही या अंधश्रद्ध महायान पंथाने म्हटले होते. आचार्य रजनीशांनी काही काळ स्वतःला मैत्रेय बुद्ध म्हणून पाहिले. काही मंडळी महायान पंथाने आगामी म्हणून जाहीर केलेला मैत्रेय बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच मानतात. (बुद्ध : के.एम. कांबळे, एन.जी. कांबळे, नागपूर २००५, पृ. ७१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महायान पंथ नाकारला. पण त्याहून त्यांनी अवतारवाद नाकारला. कारण अशा भाकड गोष्टींवर डॉ. आंबेडकरांचा बुद्धिवाद विश्वास ठेवणे शक्य नाही. त्यामुळे महायानाच्या आणि पर्यायाने हिंदूंच्या या अशा अंधश्रद्धांशी बाबासाहेब आंबेडकरांना जोडू नये.

आणखी एक गोष्ट : बहुतेक सर्वच राजकीय नेते, भिक्खू, साहित्यिक, कार्यकर्ते, डॉक्टर्स, प्राध्यापक हे आपल्या लेखना-भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर असा करतात. मी हे खूपदा ऐकले आहे.

बोधिसत्त्व म्हणजे ज्ञानी नव्हे. ज्ञानी होण्यासाठी जो प्रयत्न करतो आहे तो बोधिसत्त्व ! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात बुद्ध होण्यासाठी बोधिसत्त्वाला कोणकोणत्या अवस्थांमधून जावे लागते त्यासंबंधी लिहिले आहे. मुदिता, विमलता, प्रभाकारी, अर्चिष्मती, सुदुर्जया, अभिमुखी, दूरङ्मा, अचल, साधुमति आणि धर्ममेघ या दहा अवस्था आहेत. आधुनिक ज्ञानमीमांसेच्या संदर्भात वरील सर्वच गोष्टी वेगळ्याही पद्धतीने सांगता येतील. पण बौद्धवाङ्मयात बुद्ध होण्याच्या म्हणजे ज्ञानी होण्याच्या ज्या दहा पायऱ्या सांगितल्या आहेत. त्या दहाही पायऱ्या पार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे गेलेले आहेत आणि ज्ञानी झालेले आहेत हे कोणालाही मान्य करावेच लागेल. दहाव्या अवस्थेनंतर बोधिसत्त्व बुद्ध होतो. ही दहा लक्षणे ज्ञानी होण्याची आणि अर्थात जीवनमुक्त होण्याची लक्षणे आहेत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दहाही अवस्था पार केल्याने त्यांना बोधिसत्त्व म्हणणे हा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाच नव्हेतर ज्ञानमीमांसेचाच अवमान ठरेल. सिद्धार्थाला ज्ञानप्राप्ती झाली आणि सिद्धार्थ बुद्ध झाला. ही ज्ञानप्राप्ती म्हणजे मोक्षाची प्राप्ती अजिबात नव्हे. कोणती आध्यात्मिक सिद्धिही ती अजिबात नव्हे. बुद्धाला झालेली ज्ञानप्राप्ती ही कुणा परमेश्वरासंबंधी नव्हे. बुद्धाला झालेल्या ज्ञानप्राप्तीचा परलोकाशी, परमार्थाशी, अध्यात्माशी, मोक्षाशी, परमेश्वरप्राप्तीची वा आत्मज्ञानाशी काहीही संबंध नाही. अशा कोणत्या ज्ञानप्राप्तीसाठी बुद्धाचा आटापिटा नव्हता. स्वार्थ,

लोभ, असूया, अहंकार अशा गोष्टींमुळे माणसाच्या जीवनात अनेक युद्धे जन्माला आली. नाना प्रकारच्या विषमता आणि शोषण जन्माला आले. इथे मग इतरांना दुःखात लोटणारेही दुःखी झाले आणि दुःखात लोटले गेलेलेही दुःखी झाले. दुनिया अशी दुःखालय झाली. तृष्णेच्या भीषण आगीत जळणारे अरण्य ती झाली.

हे पेटणारे जीवारण्य शांत व्हावे. त्याचे पेटणे थांबावे. हे जीवारण्य दुःखमुक्त व्हावे यासाठी सिद्धार्थाचा आटापिटा चालला होता. शाक्य आणि कोलिय यांच्या संघर्षापासून सिद्धार्थाला या समस्येने बेचैन केले होते. या समस्येचे एक नवे, सम्यक् स्पष्टीकरण ज्या क्षणी सिद्धार्थाला गवसले, त्याक्षणी सिद्धार्थ बुद्ध झाला. सिद्धार्थ ज्ञानी झाला. बुद्ध महाज्ञानी झाला. महाबुद्ध झाला.

हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भात म्हणावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एम.ए., पीएच.डी., डी.एस्सी, एल.एल.डी., डी.लिट्, बार-ॲट-लॉ. एवढ्या केवळ सर्वोच्च पदव्यांनीच मंडित झाले असे नव्हे तर त्यांनी अनेक ज्ञानवंतांना ज्ञानी करणारे ज्ञान निर्माण केले. याचा अर्थ बाबासाहेब आंबेडकर ज्ञानीच केवळ आहेत असे नाही तर ते महाज्ञानी आहेत असेच म्हणायला हवे. म्हणजे खुद्द महाज्ञानी या अर्थाने बुद्धाला महाबुद्ध म्हणायला हवे त्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही बुद्ध, महाबुद्ध म्हणायला हवे. बुद्ध हे नाव नव्हे. ते बिरुद आहे. म्हणून जो अजून ज्ञानी नाही म्हणजे बुद्ध नाही त्याला महायान्यांनी बोधिसत्त्व ही उपाधी लावली. ही उपाधी महाज्ञानी आंबेडकरांना लावू नये. मोठे राजकारणी, साहित्यिकही भाषण सुरू करतात. अत्यंत ठसकेदार पद्धतीने 'बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर' असे म्हणतात तेव्हा फार वाईट वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रज्ञासूर्य होते असे म्हटले जाते. याचा अर्थ अत्यंत प्रखर अशी बुद्धिमत्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लाभली होती. प्रचंड मेहनतीने, जिद्दीने त्यांनी आपली बुद्धिमत्ता अधिकच तल्लख केली होती. अठरा अठरा तास अभ्यास करून आणि चिंतन करून त्यांनी उपलब्ध ज्ञानावर आपली हुकमत प्रस्थापित केली होती आणि त्या त्या शास्त्रातील ज्ञानाला कालसंगत नवे आयामही त्यांनी प्राप्त करून दिले होते. त्यांनी इतिहासाचा गहन अभ्यास केला आणि इतिहासातील घटनांचे नवे अन्वर्थन केले. त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला आणि याही शास्त्रात काही नवी क्षितिजे उघडून दिली. त्यांनी समाजशास्त्राचा खोल अभ्यास केला आणि त्यातील घटितांचेही दुर्लक्षितलेले अर्थ लावून दाखविले.

त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला आणि धर्म व धम्म अशी मूलगामी विभागणी करून बुद्धाच्या धम्माला इतर धर्मांपासून प्रथम वेगळे काढले. त्याला परिवर्तनाशी, बुद्धिवादाशी आणि उदंड समतेशी जोडले. त्यांनी कायदेशास्त्र अभ्यासले, वेगवेगळ्या देशांच्या संविधानांचा अभ्यास केला आणि भारतीय कायद्याला तसेच भारतीय संविधानाला सर्वलोककल्याणाशी, दुर्बल घटकांच्या उन्नयनाशी जोडले. त्यांनी राज्यशास्त्राचा अभ्यास केला आणि याही क्षेत्रावर त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रखर मुद्रा उमटविल्या. कुटुंबनियोजन, लोकसंख्या, भटके-विमुक्त, आदिवासी, स्त्रिया, पाणी, बीज, शेती अशा कितीतरी प्रश्नांकडे त्यांनी नव्या दृष्टीने पाहिले आणि त्यांच्या संदर्भात नवी, अन्वर्थक, सर्जनशील आणि विकासोन्मुख मांडणी केली.

वरील सर्वच संदर्भांमधील त्यांचे योगदान हे अत्यंत मूलगामी, स्वतंत्र बुद्धीचे आणि मानवी जीवनाला उपकारक मानले जाते. वरील सर्वच संदर्भात केवळ उपलब्ध असलेले ज्ञान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अभ्यासले नव्हते तर त्या त्या क्षेत्रातील घटितांचे गहन चिंतन करून त्या त्या क्षेत्रात नवी आकलने आपल्या नव्या प्रज्ञेच्या जोरावर दिली होती. त्यांनी आपल्या सर्जनशील प्रज्ञेच्या बळाने ज्ञानाला नवे आयाम बहाल केले होते.

जीवनाच्या सर्वच क्षेत्रांचे त्यांनी अत्यंत मूलगामी पातळीवरून चिंतन केले होते. असे करून त्यांनी एकूणच जीवनाच्या नवनिर्माणाचा विचार बुलंद करीत नेला होता. त्यांनी वरील सर्वच शास्त्रांमधील विचारमंथनाच्या निमित्ताने आदर्श मानवी जीवनाची आपली एक कल्पना मांडली आहे. आदर्श माणूस कसा असावा ? माणसांचा आदर्श समाज कसा असावा ? एकूणच जीवनाचे आदर्शरूप काय असावे याचा एक सम्यक् विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चिंतनातून साकार होतो.

जगाच्या पाठीवर अनेक प्रज्ञावंतांनी आदर्श समाजाच्या कल्पना मांडलेल्या आहेत. आपल्याकडे चार्वाकांनी आदर्श समाजाची कल्पना मांडली आहे. बुद्धाचे समग्र तत्त्वज्ञान एका नव्या आणि आदर्श समाजाच्या निर्मितीसाठीच जन्माला आले आहे. पाश्चात्त्य जगात सॉक्रेटिस, प्लेटो, अरिस्टॉटल, मार्क्स अशा अनेक बुद्धिवंतांनी आदर्श समाजाची चित्रे काढली आहेत आणि विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका संपूर्ण आदर्श समाजाची मांडणी केलेली आहे.

समाजाची वेगवेगळी अंगे असतात. समाजातील शिक्षण, अर्थशास्त्र, कायदा, राजकारण, साहित्य, नैतिकता या सर्वच संदर्भातील आदर्शांची मांडणी

एखादा विचारवंत आपल्या पद्धतीने करीत असतो. समाज म्हटला की स्त्री आणि पुरुष हे दोन मूलभूत घटक त्यात जवळजवळ समप्रमाणात असतात. या दोन मूलभूत घटकांचे संबंध कसे असावेत ? ते गुलाम आणि मालक या पातळीवरचे असावेत की मित्रत्वाच्या, समतेच्या पातळीवरचे असावेत ? या प्रश्नाची मांडणी करावी लागते. समाजात वर्ण असावेत, समाजात जाती असाव्यात, समाजात वर्ग असावेत, समाजात स्त्री-पुरुष विषमता असावी अशी मांडणी काही विचारवंतांनी केली आहे. मनू आणि त्याच्या पठडीतील सर्व लोकांचा यासंदर्भात निर्देश करता येईल. ही मांडणी आदर्श आहे काय ? विषमतेला आदर्श म्हणता येईल काय ? अस्पृश्यता ज्या समाजात आहे त्याला आदर्श समाज म्हणता येईल काय ? ज्या समाजात अंधश्रद्धा आहेत, लोक खुळचटपणे विचार करतात, लोक दैववादी आणि देवभोळे आहेत, लोक मानवी बुद्धीवर विश्वास ठेवीत नाहीत आणि तिचा विकास करीत नाहीत अशा लोकांच्या समाजाला आदर्श समाज म्हणता येईल काय ? नाही. अशा समाजाला आदर्श समाज म्हणताच येत नाही. परस्परांविषयी सदभाव, परस्परांविषयी कळवळा आणि कौटुंबिक जिव्हाळा या गोष्टी आदर्श समाजातील माणसांमध्ये असाव्यात. सहजीवनाचे सजग भान माणसांमध्ये असायला हवे. माणसे परस्परहितैषी असावीत. परस्परांसाठी लोकांची मने तुटावीत. माणसे परस्परांना प्रत्येकच गोष्टीत सहकार्य करणारी असावीत.

माणसे एकाच ठिकाणी थांबणारी नसावीत. ती नदीच्या प्रवाहासारखी वाहती आणि वाहत्या प्रवाहासारखी निर्मळ असावीत. माणसे प्रज्ञावंत असावीत, बुद्धिवादी असावीत. विज्ञानवादी आणि परिवर्तनवादी असावीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाचा हा आदर्श प्रत्यक्षात उतरावा यासाठी; समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय असावा यासाठी आणि समाजात सतत सर्जनशील वातावरण असावे यासाठी जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्राची वेगळी स्वरूपे चितारली आहेत.

समाजातील शिक्षण, राजकारण, अर्थकारण, साहित्य, भौतिकता आणि नैतिकता या सर्वच गोष्टींचे ध्येय हा आदर्श समाज हेच असले पाहिजे. या प्रत्येकच क्षेत्राची धडपड आदर्श समाजाकडे जाणे, सर्व माणसांना त्याच ध्येयाकडे घेऊन जाणे हेच असले पाहिजे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील या प्रत्येकच घटकाला आदर्श समाजाकडे जाण्याचे ध्येय दिलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या या सर्व चिंतनातून समाजासंबंधीची एक संपूर्ण नवी व्यवस्था, आदर्श समाजासंबंधीची एकत्र एक संपूर्ण नवी व्यवस्था साकार होते. आदर्श समाजासंबंधीचे एक संपूर्ण नवे प्रारूप साकार होते. या प्रारूपाला, या तात्त्वज्ञानिक संयोजनाला आंबेडकरवाद असे म्हटले जाते. आंबेडकरवाद हे दुसरे-तिसरे काहीही नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हव्या असणाऱ्या, त्यांना आदर्श वाटणाऱ्या समाजाचीच रूपरेषा आहे.

आंबेडकरवाद ही एक संकल्पना आहे. एक चित्र आहे. एक स्वप्न आहे. एक महास्वप्न आहे. संपूर्ण बुद्धिवादी आणि समतावादी माणसाच्या निर्मितीची ही योजना आहे. जातीविहीन, वर्ण-वर्गविहीन अशा प्रबुद्ध माणसाच्या आणि प्रज्ञानी समाजाच्या निर्मितीचा तो एक महाप्रयोग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यसमाजवादाची एक अत्यंत गंभीर मांडणी केली. हा समाजवाद केवळच आर्थिक समतेपाशी थांबत नाही. तो संपूर्ण समतोल साधू इच्छिणारा एक महाप्रकल्प आहे. म्हणून या राज्यसमाजवादाला आपण सांस्कृतिक समाजवाद म्हटले पाहिजे. हा समाजवाद क्रांतीकारीही आहे आणि सतत परिवर्तनवादीही आहे.

या सर्व गोष्टींचे अत्यंत विधायक सर्जन करणारा मेंदू युगमेंदूच आहे. शिवाय हे सर्व संयोजन एका काळापाशी थांबत नाही. एका भाषिक समूहापाशी थांबत नाही वा एका सांस्कृतिक प्रदेशापाशी थांबत नाही. हा समाजवाद समतेच्या पहिल्या प्रश्नापासून सुरू होतो आणि समतेच्या सम्यक् रूपापर्यंत, समतेच्या पूर्णांकापर्यंत धावत जातो.

अस्पृश्य आणि त्यातील पोटजातींपासून म्हणजे समाजाच्या विघटनाच्या शेवटच्या कडीपासून या चिंतनाला प्रारंभ होतो. या कडीच्या निर्मूलनापासून हा समाजवाद आपला प्रवास सुरू करतो आणि एका आदर्श विश्वमानवापर्यंत जातो. एक आदर्श वैश्विक समाज या संपूर्ण समाजवादाला आपले ध्येय वाटतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली आदर्श समाजाची कल्पना बंदिस्त नाही. ती मुक्त आहे. ती तयार उत्तरांसारखी नाही. येणाऱ्या काळाचे वाचन जबाबदारीने करायला लावणारी आणि त्या त्या काळातील समस्यांची उत्तरे शोधण्याची एक शास्त्रशुद्ध, एक वैज्ञानिक पद्धती असे या कल्पनेचे स्वरूप आहे. सतत सर्जनशीलता हे या आदर्श समाजाचे रूप आहे. भोवतीच्या भौतिक तपशीलातून वाट काढत एका आदर्श समाजाच्या नैतिकतेकडे झेपावणारा प्रवास, त्या आदर्शाकडे निघालेला प्रयोग असे या तत्त्वप्रणालीचे स्वरूप आहे.

या संपूर्ण आदर्श समाजाच्या संरचनेत एक रेखीवपणा आहे. सेंद्रियता आहे. एक संपूर्णता आहे. आदर्श समाजाचे सुंदर शिल्प असावे तसे आंबेडकरवादाचे स्वरूप आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ सालातील १४ ऑक्टोबर रोजी धम्मक्रांती केली. या संपूर्ण देशात तोपर्यंत बुद्धाचे बऱ्यापैकी विस्मरण लोकांना झाले होते. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मक्रांती केली आणि पुन्हा आता भारत बौद्धमय होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भटके-विमुक्त, आदिवासी, चर्मकार बांधव, मातंग, भंगी बांधव आणि ओबीसी बांधवही उत्स्फूर्तपणे धम्माचा स्वीकार करीत आहेत. धम्मक्रांतीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात भारत बौद्धमय होण्याच्या दिशेने आगेकूच करू लागला आहे.

सांस्कृतिक समाजवाद मांडणारा आंबेडकरवाद ज्यांच्या मूलगामी चिंतनातून साकार होतो ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापंडित आहेत; महाज्ञानी आहेत आणि महाज्ञानी या अर्थाने महाबुद्ध आहेत. शिवाय त्यांच्यामुळेच बुद्धाच्या आणि अशोकाच्या नंतर संपूर्ण देश आणि जगही बुद्धमय होण्याच्या मार्गावर येऊन उभे राहिलेले आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्यही बुद्धाच्या कार्याएवढेच महत्त्वाचे आहे. म्हणूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महाबुद्ध म्हटले पाहिजे असे मला वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महत्ता ऐतिहासिक परिप्रेक्षात बघायला हवी. हे झाले तर या महत्तेचे वैशिष्ट्य अधिकच उठून दिसते. या देशातील १९५६ पूर्वीचे बुद्धाचे अस्तित्व आणि १९५६ नंतरचे अस्तित्व यांच्यात फार मोठी तफावत आहे. हेच फुल्यांच्या बाबतीतही म्हणता येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकहितवादींची शतपत्रातील काही पत्रे 'बहिष्कृत भारता'मधून पुनर्प्रकाशित केली होती. लोकहितवादी आणि जोतीबा फुले यांनाही महाराष्ट्रातील प्रतिगाम्यांनी जवळजवळ निष्प्रभच करून टाकले होते. बुद्धाला तर त्याहीपूर्वीपासूनच हिंदू धर्माचा भागच जवळजवळ करून टाकले होते. बुद्धाचे तत्त्वज्ञान क्रांतीकारी होते. ते इहवादी होते. हे तत्त्वज्ञान ईश्वर, आत्मा वा कर्मविपाक मानीत नव्हते पण हिंदूंनी बुद्धाचे हे क्रांतीकारकत्व पुसून टाकण्याची मोहिमच राबविली. त्याला विष्णूचा अवतार ठरवले. त्याची पूजा सुरू केली. त्याला ईश्वरच करून टाकले. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूळ बुद्धिवादी बुद्ध जगापुढे मांडला. बुद्धावर प्रतिगाम्यांनी चढवलेले विकृतीचे थर त्यांनी पार खरवडून काढले आणि फेकून दिले. याप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूळ क्रांतीकारी

बुद्धाची पुनःस्थापना केली. देशात बुद्ध एक क्रांतीचे नवे आंदोलन झाला. क्रांतीचा हा अभिनव चेहरा बुद्धाला पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. या सर्व गोष्टींचा विचार केला तर धम्माच्या क्षेत्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ अनन्यसाधारण आहे, केवळच अजोड आहे ही गोष्ट कोणाच्याही लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे सर्वच धम्मानुयायांनी बुद्धाएवढाच सन्मान आणि आदर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही दिला पाहिजे असे मला नम्रपणे वाटते.

शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर तत्त्वज्ञानी आहेत. महातत्त्वज्ञानी आहेत. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशा सांस्कृतिक समाजवादाचे, यापुढल्या काळात घडणाऱ्या क्रांतीचे अत्यंत रेखीव तत्त्वज्ञान त्यांनी बारकाव्यांसकट मांडले आहे. बुद्ध या शब्दाचा अर्थ तरी काय आहे ? बुद्ध या शब्दाचा अर्थ ज्ञानी असाच आहे. याचा अर्थच असा की बुद्ध हे ज्ञानी आहेत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरही क्रांतीची नवी रूपरेषा आणि नवी ज्ञानमीमांसा देणारे ज्ञानीच आहेत. याचा अर्थ तेही बुद्धच आहेत. बुद्धापूर्वी ज्ञानी या अर्थाने काही बुद्ध होऊन गेले. त्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बुद्धानंतरचे बुद्ध आहेत असे म्हणायला हवे आणि ही कल्पना अवतार कल्पनेशी जोडण्याची घोडचूक कोणीही करू नये.

इथेच आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. बुद्धाला बुद्ध म्हणणे हा बुद्धाचा सन्मानच आहे. पण बुद्धाच्या ज्ञानाची नवता आणि उपकारकता या गोष्टी लक्षात घेता त्यांना महाबुद्ध म्हणणं हा त्यांचा महासन्मान आहे. बुद्धाच्या पूर्वी काही ज्ञानी माणसे झाली आहेत. म्हणजेच बुद्धापूर्वीही काही बुद्ध झाले आहेत असे स्वतः बुद्धानेच म्हटले आहे. पण बुद्धापूर्वीच्या बुद्धांचा तत्त्वज्ञानी म्हणून आपल्यापर्यंत लौकिक पोचला नाही. याचे कारण ते बुद्ध असले तरी सिद्धार्थ हे नाव धारण केलेल्या एका व्यक्तीतून जो बुद्ध साकार झाला; त्याने जे तत्त्वज्ञान दिले ते बुद्धापूर्वी होऊन गेलेल्या बुद्धांना शक्य झाले नाही. म्हणजे आहे त्या ज्ञानाचा अंगीकार आणि नव्या ज्ञानाची निर्मिती या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत. या अर्थाने बुद्धापूर्वी जे अनेक बुद्ध होऊन गेले त्यांच्या पार्श्वभूमीवर सिद्धार्थ गौतमातून साकार झालेला बुद्ध महाबुद्ध ठरतो. म्हणजे विद्यमान परिवर्तनवादी ज्ञानाचेच संपादन करणारे ते बुद्ध आणि या विद्यमान ज्ञानालाही गौरव वाटेल असे नवे ज्ञान प्रकाशित करतात ते महाबुद्ध होत असे म्हटले पाहिजे आणि या अर्थाने सिद्धार्थ गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघे खऱ्या अर्थाने महाबुद्ध ठरतात असे यथार्थपणे म्हणता यायला हवे.

शिवाय बुद्धाआधीच्या अनेक बुद्धांच्या पार्श्वभूमीवर सिद्धार्थ गौतम बुद्ध महाबुद्ध ठरतो अशी मांडणी करून बुद्धाला महाबुद्ध म्हणावे असे आजवर कोणला का सुचले नाही असा प्रश्न मला पडला होता. म्हणून एक नवे, प्रज्ञानी, सुखी आणि शांततामय जगण्याचे तत्त्वज्ञान दुनियेला देणारा बुद्ध, बुद्ध या शब्दातून व्यक्त होणाऱ्या आशयात मावत नाही. म्हणून त्याला महाबुद्ध म्हणणे हे जास्त समर्पक आहे असे मी मानतो आणि असे करून मी बुद्धाचा विशेष सन्मान करतो असे मला वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भातही हीच गोष्ट खरी मानावी लागते. आंबेडकरवाद हे जीवनाच्या संपूर्ण उन्नयनाचे सम्यक् तत्त्वज्ञान आहे. हे तत्त्वज्ञान सांस्कृतिक समाजवादाचे बुद्धिवादी तत्त्वज्ञान आहे. हे तत्त्वज्ञान मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्ध आहेतच. ज्ञानी आहेत. पण केवळ ज्ञानी या शब्दात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेही हे बौद्धिक आणि सर्जनशील आंदोलन मावत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. याचा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाज्ञानी आहेत आणि बुद्ध या शब्दाचा अर्थ जर ज्ञानी असा आहे तर सिद्धार्थातून उगवलेल्या महाबुद्धाप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरही भीमरावातून उगवलेले महाबुद्धच आहेत असे अत्यंत तार्किक पद्धतीने म्हणणे भाग आहे. शिवाय आपल्याला हेही माहीत आहे की बुद्ध हे कुणा एखाद्याच व्यक्तीचे नावही नव्हे. कोणाही खऱ्या ज्ञानवंताला दिली जावी अशी ती उपाधी आहे. सिद्धार्थ या नावातून साकार झालेल्या महाबुद्धाप्रमाणे भीमरावातूनही महाबुद्ध साकार होऊ शकतो आणि तसा तो झालाही आहे ही गोष्ट आपण सर्वांनी मान्यच केली पाहिजे. बुद्ध या बिरुदाने गौरवावी अशी अनेक कर्तृत्वे पुढेही जन्माला येऊ शकतात आणि महाबुद्ध या बिरुदाने गौरवावी अशीही कर्तृत्वे पुढेही जन्माला येऊ शकतात.

बुद्ध होण्याची प्रक्रिया कोणी बंद करू नये. ते कृत्य बुद्धाच्या विरोधीही ठरेल आणि असे कृत्य आंबेडकरविरोधीही ठरेल. ज्ञानमीमांसेची वाट अडवण्याचे अधिकार कोणालाही नाहीत. ज्ञानाच्या प्रवाहाला घरणात कोंडण्याचा प्रयत्न कोणी करू नये असे मला वाटते.

सिद्धार्थ गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही महाबुद्धांना माझे विनम्र अभिवादन !

•••

२

धम्म : भारतीय संविधानाचा प्राण

बुद्धाचा धम्म हा आदर्श समाजाचेच संविधान होय आणि भारतीय संविधान म्हणजे आदर्श समाजाचा धम्मच होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळच कायद्याचे तज्ज्ञ नव्हते; केवळच जगातील संविधानांचे अभ्यासक नव्हते तर ते आधुनिक ज्ञानविज्ञानाचेही प्रगाढ अभ्यासक होते. भारतीय समाजसंस्थेचे आणि या समाजसंस्थेला आधारभूत ठरलेल्या तत्त्वज्ञान-परंपरांचेही ते अभ्यासक होते. भारतीय समाजातील सामाजिक, राजकीय, आर्थिक अन्यायाचे चित्र त्यांनी स्पष्ट करून घेतले होते. या सर्व प्रचंड अभ्यासामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतीय समाजक्रांतीसंबंधीची भूमिका पक्की झाली होती. भारतीय संविधानाच्या निर्मितीच्या काळात त्यांची प्रज्ञा एका परिणत अवस्थेला पोचली होती. भारतीय समाजात मूलगामी परिवर्तन घडून यावे, हा समाज विज्ञाननिष्ठ, इहवादी आणि करुणावादी व्हावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ठामपणे वाटत होते.

याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्ध धम्माचा अभ्यास पूर्ण होत आला होता. बुद्धाच्या धम्मात त्यांना आदर्श भारतीय समाजाचे प्रारूप दिसले होते. त्यांच्या संपूर्ण चिंतनप्रक्रियेवर धम्माचा प्रभाव याहीआधीपासूनच पडायला लागलेला होता. एकेकाळी कधीतरी भारत बौद्धमय होता. पण या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण मनच बुद्धमय झाले होते. त्यांचे संपूर्ण भावविश्वच धम्माने व्यापले होते.

१९४६ साली त्यांनी मुंबईत 'सिद्धार्थ' महाविद्यालयाची स्थापना केली. महाविद्यालयाचे 'सिद्धार्थ' हे नाव ठेवण्यामागील त्यांचा उद्देश स्पष्ट होता. पुढे १९५० साली औरंगाबादेला त्यांनी 'मिलिंद' महाविद्यालयाची स्थापना केली आणि औरंगाबादेच्या मिलिंदच्या शैक्षणिक परिसराला त्यांनी 'नागसेनवन' हे नाव दिले. १९५१ मध्ये 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ लिहिण्याचा विचार त्यांच्या मनात आला.

या सर्व घटितांचा अर्थ असा की या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या भावविश्वात आणि विचारविश्वात बुद्ध पक्का स्थानापन्न झाला होता. याच काळात म्हणजे १९४६ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाला आपल्या जीवनदृष्टीचा आशय आणि दिशा देत होते. यावेळच्या त्यांच्या धम्ममनस्कतेच्या मुद्रा एकूणच संविधानाच्या वैचारिक जडणघडणीवर उमटणे साहजिकच होते.

धम्माच्या इतिहासात आजवर तीन प्रमुख महानायक झालेले आहेत. बुद्ध म्हणजे धम्माचा संस्थापक महानायक आहे. अशोक हा दुसरा महानायक आहे आणि त्याच्याच कर्तृत्वामुळे भारत बौद्धमय झाला होता. या देशाच्या सांस्कृतिक इतिहासातल्या काही थोड्या गोष्टी कोणत्याही वैचारिक वादळांमध्ये उरतीलच. त्यात एक नाव अशोकाचे असेल. भारतीय मानवतेचा इतिहास या विशेषनामाला मुजरा करूनच पुढे जाईल यात मला शंका वाटत नाही. अशोकचक्र भारताच्या राष्ट्रध्वजावर आहे. या चक्राला सत्यधर्माचे आणि शांततापूर्ण परिवर्तनाचे प्रतीक मानले जाते.

शिवाय २६ जानेवारी १९५० रोजी भारताने सारनाथमधील अशोक स्तंभाचे शीर्ष आपले राष्ट्रचिन्ह म्हणून स्वीकारले आहे. हा स्तंभ अशोकाने मृगदाव येथे उभारला होता. इथे बुद्धाला मानव कल्याणाच्या तत्त्वज्ञानाची प्राप्ती झाली होती आणि इथेच त्याचे पहिले धम्मव्याख्यानही झाले होते.

या राष्ट्रचिन्हावर 'सत्यमेव जयते' असे नमूद करून भारताने सत्याची महत्ता मान्य केली आहे. या राष्ट्रचिन्हातील सिंहांच्या पायाशी अशोक चक्र आहे. हे राष्ट्रचिन्ह संविधानाच्या मुखपृष्ठावरही आहे आणि संविधानाच्या शीर्षक पृष्ठावरही आहे आणि अशोक धम्माच्या इतिहासातील महानायक होता. राष्ट्राने अशोकाच्या स्वीकाराने याप्रकारे धम्माचाच अवलंब केला आहे. धम्माचीच बांधिलकी पत्करली आहे. याप्रकारे संविधानाच्या देहावरही धम्मप्रतीक आहे आणि संविधानाच्या अंतरंगातही धम्मच आहे. म्हणूनच धम्म हा भारतीय संविधानाचा प्राण आहे असे म्हणायला हवे.

धम्म हे इहवादी तत्त्वज्ञान आहे. बुद्धिवाद हा त्यांचा अर्थ आहे. विज्ञानदृष्टी ही बुद्धाच्या धम्माची विचार करण्याची पद्धती आहे. सर्वच सतत बदलत राहते हा धम्माचा गतिवादी वा प्रगतिवादी दृष्टिकोन आहे. जात, वर्ण, वर्ग वा लिंग असा कोणताही भेद धम्माला मान्य नाही. एक जातीवर्णविहीन समाज, स्त्री-पुरुष समतेवर अधिष्ठित असलेला समाज हा धम्माचा आदर्श आहे. बुद्ध हे सर्व प्रकारच्या विषमतांच्या आणि अंधश्रद्धांच्या विरुद्ध सुरू झालेले

आंदोलन होते. बुद्धाने निब्बाणाची कल्पना मांडली. ही कल्पना आदर्श मानवी संबंधांचीच कल्पना आहे. बुद्धिवादी माणसाने करुणामय वृत्तीने केलेले आचरण म्हणजे निब्बाण ! निब्बाण ही संपूर्ण समाजाचीच जीवनशैली व्हावी यासाठी बुद्ध प्रयत्न करीत होता. प्रतीत्यसमुत्पाद हा बुद्धाच्या विज्ञानदृष्टीचा पुरावा आहे. संपूर्ण समाजाचे एक नवे मन, संपूर्ण जीवनाचे एक नवे मन हे बुद्धाचे ध्येय होते. हा खरे म्हणजे संपूर्णतः मानवी प्रतिष्ठेच्या प्रस्थापनेचाच प्रस्ताव होता.

संविधानसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाचे शिल्पकार या नात्याने २५ नोव्हेंबर १९४९ रोजी समारोपावे भाषण केले. त्या भाषणात त्यांनी बौद्ध भिक्खूंच्या संघातील लोकशाहीचा निर्देश केला आहे. त्यांनी म्हटले होते "बौद्ध भिक्षुकांच्या संघाचे परिशीलन केल्यास हे स्पष्ट दिसून येते की, भारतात नुसती पार्लमेंटच होती असे नव्हे तर आधुनिक पद्धतीचे पार्लमेंटरी नियमही त्यांना पूर्ण अवगत होते. पार्लमेंटात कोणी कोठे बसावे; ठराव कसे आणावे, 'कोरम' किती असावा, पक्षप्रमुख कोणास मानावे, गुप्त मतदान कसे करावे, अविश्वासाचा ठराव कसा संमत करावा वगैरेसंबंधी बौद्धभिक्षुकांनी आपल्या संघात नियम केले होते. हे पार्लमेंटरी नियम गौतम बुद्ध फक्त भिक्षुकांच्या संघासच लागू करीत होते हे खरे असले तरी, बुद्धाने ते नियम तत्काळी चालत असलेल्या राज्य पद्धतीतून घेतले असावेत ..." याचा अर्थ भारतात पूर्वी लोकशाही होती. इथे त्याकाळात प्रजासत्ताक राज्ये होती. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात आणि १९५० साली भारताने स्वीकारलेल्या आणि संविधानात अंतर्भूत असलेल्या लोकशाहीचे नाते ते एका अर्थाने धम्माशी जोडतात.

एवढेच नाही तर संविधानाच्या उद्देशिकेमध्ये ज्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यत्रयीचा ध्येय म्हणून निर्देश आहे ती मूल्ये आपण फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतली नसून आपण ती बुद्धाच्या धम्मातून घेतलेली आहेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात. याचा अर्थ संविधानाचा सर्व वैचारिक गाभा आपणाला धम्मात दिसतो. धम्माचे ध्येय आणि संविधानाचे ध्येय एकच आहे. धम्माला हवा असलेला माणूस आणि संविधानाला हवा असलेला माणूस सारखाच आहे. बुद्धाला हवे त्या लोककल्याणकारी समाजाचे रूप आणि संविधानाला अभिप्रेत असलेल्या समाजाचे रूप यात कुठेही तफावत नाही.

संविधानातील कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्त्वे या भागातील संपूर्ण आशयावर धम्माचा प्रभाव पडलेला आहे. भारतीय संविधानाची उद्देशिका, ही एखाद्या सुंदर कवितेसारखी आहे. सर्व देशाने व्यक्त केलेला संकल्प या उद्देशिकेत ग्रथित

झालेला आहे. इहवादी (Secular) दृष्टी या उद्देशिकेची विज्ञानदृष्टी आहे. या पायाभूत तत्त्वावर सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्यायाने आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाने युक्त अशी समाजरचना हे संविधानाचे सामाजिक ध्येय आहे. या उद्देशिकेत एका आदर्श समाजाचे प्रारूप संक्षेपाने आलेले आहे. संविधान कोणताही भेद मानीत नाही. (कलम : १५) संविधानाने अस्पृश्यता नष्टच करून टाकली आहे (१७) संविधान एकरूप समान नागरी संहितेचा पुरस्कार करते (४४) संविधान मादक पेयांचा निषेध करते (४७) दुर्बल घटकांचे हित संविधानाला महत्त्वाचे वाटते (४६) हिंसाचाराचा संविधान त्याग करते. (५१ : झ) विज्ञानदृष्टी, मानवतावाद, शोधकबुद्धी आणि सुधारणावादाचा पुरस्कार (५१ : ज) संविधान करते. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जावून भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य, व बंधुभाव वाढीला लावण्याची आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करण्याची भूमिका स्पष्टपणे संविधान मांडते. संविधानाच्या सर्वच मूल्यदृष्टीतून धम्मच बोलतो आहे असे म्हणता येईल.

धम्माचे ध्येय सांस्कृतिक समाजवाद हेच आहे आणि या ध्येयाहून भारतीय संविधानाचे ध्येय कोणत्याही अर्थाने वेगळे नाही. धम्म ही भारताच्या इतिहासात एक अपूर्व आणि अनन्यसाधारण घटना आहे त्याप्रमाणे भारताचे संविधान ही सुद्धा भारताच्या इतिहासामधली अपूर्व आणि अनन्यसाधारण घटना आहे. धम्म हा जसा क्रांतीचा कार्यक्रम आहे त्याप्रमाणे भारताचे संविधान हाही क्रांतीचाच कार्यक्रम आहे. मूलगामी समाजक्रांतीच्या आशयाची अभिव्यक्ती धम्मातून झाली आहे आणि संविधानातूनही झाली आहे. प्रज्ञावंतांचा आणि करुणावंतांचा समाज म्हणजेच बुद्धिवाद्यांचा समतामय समाज हेच ध्येय धम्माचेही आहे आणि संविधानाचेही आहे.

धम्म हा क्रांतीचा कार्यक्रम आहे आणि क्रांती समाजातील नव्वद टक्के लोकांची गरज असते. संविधान हा क्रांतीचा कार्यक्रम आहे आणि क्रांती ही समाजातील नव्वद टक्के लोकांची गरज असते.

विषमतेमुळे ज्यांचे हित होते ते लोक समाजात फार कमी असतात. हे फार कमी लोकच क्रांतीला विरोध करतात. याचा अर्थ नव्वद टक्के लोकांच्या हिताला विरोध करतात. धम्म आणि संविधान या दहा टक्के अंगुलीमालांना नव्वद टक्के लोकांच्या हिताशी जोडण्याचा निर्धार करतात.

याचा अर्थ धम्मात भारतीय लोकांच्या इच्छा-आकांक्षाची अभिव्यक्ती आहे. इ.स. पूर्व काळात लोकांच्या सामाजिक न्यायाच्या तहानभुकेतून धम्म साकार झाला. भारतीय संविधानातही या सर्व सामाजिक न्यायाला पारख्या झालेल्या विराट जनसमूहाच्या आशाआकांक्षा प्रकट झालेल्या आहेत.

याचा अर्थ भारतीय संविधानाला आपले आदर्श, आपली नैतिक मूल्ये परदेशातून आयात करण्याची गरज भासली नाही. सामाजिक न्याय, आर्थिक न्याय तद्वतच राजकीय न्याय अशा सर्वच न्यायांची एक परंपरा भारतात आहे. ही समृद्ध परंपरा बुद्धाची आहे. बुद्धाच्या धम्माची आहे. संविधानाने सर्व प्रकारची नैतिक पोषक द्रव्ये भारतातील बुद्धधम्मातून घेतलेली आहेत. नैतिक मूल्यांच्या दृष्टीने संविधानाला असा देशी संदर्भ आहे.

सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक न्याय हा ज्या संविधानाचा ध्येयवाद असतो त्याला धम्माशी नाते जोडावेच लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळे भारतीय संविधानाने धम्माचा संपूर्ण नैतिक आशय घेतला. तो आशय असा गहन, असा अपरिहार्य आणि कल्याणकारी आहे की त्यामुळे त्याच्या वाटयाला संविधानाच्या प्राणाचीच भूमिका आली. या प्राणामुळे संविधान जिवंतही झाले आणि सर्वच लोकाच्या कल्याणाचे सुंदर अभिवचनही झाले.

***

३

करुणाच जगाला जगवेल

अग्नीने अग्नी विझत नाही. तेल ओतल्याने भांडण शमत नाही. घृणेने घृणा मरत नाही. सूडाने सूड नष्ट होत नाही. पण मानवी जीवनाला प्रारंभ झाला तेव्हापासून आगीने आग भडकवण्याच्याच यंत्रणा काम करीत आहेत. तेल ओतून भांडणे अधिक विध्वंसक करण्याचा प्रयत्न होत आहे. एकमेकींच्या जिद्दीवर घृणा वाढत आहेत. सूडाच्या भावना अधिक धारदार, अधिक स्फोटक होत आहेत. या विध्वंसक मानवी स्वभावाने दुनियेला सततच महामृत्यूच्या भेटी दिलेल्या आहेत. जगणे निर्माण करायला निघालेली माणसे कळत-नकळत अशी आपलीच मरणे फुलवित आली. जगू इच्छिणारी माणसे या मृत्यू शैलीचा अंगीकार का करतात? या प्रश्नाचे उत्तर मिळते पण प्रश्न संपत नाही. हे असे का होते ? याला पर्याय नाहीच काय? हा दुष्ट चक्रव्यूह भेदून माणसाला बाहेर येताच येणार नाही काय? येता येते. दुःखमुक्ती हा शब्द माणसाने जन्माला घातला त्यावेळी त्याच्या मनात स्वप्नांचे एक तारांगण फुलले होते. दुःखमुक्ती हा शब्द निरर्थक नाही हे त्याला दाखवून द्यायचे होते. दुःखमुक्ती हे केवळ वेडे स्वप्न नव्हे तर दुःखमुक्तीचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यासाठी तडफडणारी ती कविता आहे.

या कवितेलाच बुद्धाने धम्म म्हटले आणि या कवितेलाच सारी दुनियाही आता धम्म म्हणते. धम्म ही करुणेची कविता आहे. संपूर्ण मातृत्वाच्या आशयाचा अनुवाद बुद्धाने करुणा या शब्दात ओतला. मानवी जीवनातील सकल मातृमयतेचा इत्यर्थ बुद्धाच्या करुणा या शब्दात दाखल झाला आहे. करुणा या शब्दाचा सांस्कृतिक अर्थ आई असला आहे. अथांग कळवळा म्हणजे करुणा! माणुसकीचे विश्वासू माहेर म्हणजे करुणा ! करुणा म्हणजे किनारे नसलेला सहभावाचा सागर ! हा सागर बुद्धाच्या पोटी जन्माला आला.

ज्यांना जगायचे आहे त्यांच्यासाठी हा सहजीवनाचा सर्जनशील प्रयोग आहे. पण मरू इच्छिणारांना, मरणांच्या उत्पादकांना आणि मरणे वाटत फिरणारांना जगण्याची दीक्षा देते ती करुणा ! भ्रमात राहू नका. पालथ्या घडयावर डोळे मिटून पाणी ओतण्याची मोहीम राबवू नका. तुम्हाला मिळाला तेवढाच जन्म तुमच्या हातात आहे आणि त्याला निरर्थाच्या हवाली करू नका. पुढला जन्म

वगैरे काही नाही. पुढल्या जन्माच्या मृगजळाने कोणाचीच तहान शमणार नाही. असते सोडून नसत्याच्या पाठीशी लागू नका.

चिडण्याने प्रश्न संपत नाहीत. प्रश्न जन्माला येतात. रागाने उत्तरे जवळ येत नाहीत. दूर जातात. द्वेषाने मरण जवळ येते. जगणे दूर जाते. तेव्हा हत्यारांचा, रागाचा, द्वेषाचा बिमोड करणारे हत्यार म्हणजे करुणा. करुणा म्हणजे प्रज्ञानी प्रेम! जगण्याचा आधार प्रेम आहे. द्वेष हा जगण्याचा मृत्यू आहे. बुद्ध म्हणतो प्रेमाने द्वेषाला जिंका. माणसाचे जीवन सुंदर आहे. ही सुंदरता जपा. ही सुंदरता वाढवा. ती नष्टही करू नका. कमीही करू नका. बुद्ध हे आपल्या तत्त्वज्ञानाच्या विजयासाठी सांगत नाही. बुद्ध हे मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी सांगतो आहे. जीवनात शिरलेले मरण मारण्यासाठी सांगतो आहे आणि तो हे दरडावून सांगत नाही. तो हे कळवळून सांगत आहे. हे तो आदेश देऊन सांगत नाही तो हे हितचिंतकाच्या मातृभाषेतून सांगतो आहे. हा संवाद कसा आहे ? हा धर्म, जाती, वर्ग ओलांडून माणसाच्या काळजाशी केलेला संवाद आहे.

धम्म म्हणजे काय ? धम्म म्हणजे काळजाचे काळजाशी बोलणे ! धम्म म्हणजे काळजाने काळजाचे ऐकणे ! धम्म म्हणजे माणसाने माणसाला भेटणे ! हा धम्म पुन्हा एकदा दीक्षाभूमीवर उगवला. पुन्हा एकदा उजेडाची सर्जनभूमी होण्यासाठी धम्माने दीक्षाभूमीचे निर्माण केले. ही दीक्षाभूमी नागपुरात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या युगनिर्मात्या प्रतिभेने या दीक्षाभूमीला जन्म दिला आहे.

धम्मचक्राचा जनक बुद्ध ! या चक्राला अपूर्व गती देणारा महान धम्मनायक सम्राट अशोक ! धम्माच्या आयुष्यातील तिसरे महान धम्मनायक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर !

दीक्षाभूमी ही संकल्पनाच मोठी प्रेरणाशाली आहे. दीक्षाभूमी १९५६ सालापासून इथे येणाऱ्या लाखो लोकांना दरवर्षी, दरदिवशी आणि दरक्षणी बुद्ध वाटते. इथे लोक येतात आणि दीक्षाभूमी त्यांच्या हाती आंबेडकर नावाची क्रांती ठेवते. लोकांच्या हाती बुद्ध आणि आंबेडकर देणे म्हणजे काय ? तर लोकांना माणुसकीच्या संविधानाच्या जिवंत प्रती वाटणे !

दीक्षाभूमी घृणा वाटत नाही. द्वेष वाटत नाही. दीक्षाभूमी अहंकार वाटत नाही. दीक्षाभूमी तृष्णाही वाटत नाही आणि कोणत्याही प्रकारची विषमता वाटत नाही. दीक्षाभूमी करुणेचे चांदणे वाटते. प्रज्ञेची सूर्यश्रीमंती वाटते. माणुसकीची सौंदर्यविद्या वाटते.

धम्म घेण्याचे हे प्रयोजन आहे. ही गोष्ट मागल्या पन्नास वर्षांमध्ये लोकांना कळायला लागलेली आहे. लोकांना गोष्टी केवळ तर्कतः पटून चालत नाहीत. लोकांना अनुभव यावा लागतो. लोकांचे बोलणे हे त्यांच्या अनुभवाचे बोलणे व्हावे लागते. ही अनुभवांचीच बोली लोकांना अधिक आवडते. धम्मक्रांतीच्या मागल्या पन्नास वर्षात या अशा अनुभवांचे निकाल आता येऊ लागलेले आहेत. हे दीक्षाभूमीवरून भरारलेले सुंदर बौद्धत्व आता लोकांना मोह घालू लागले आहे. धम्माला आणि आंबेडकरांना पन्नास वर्षांपूर्वी असलेला नकार आता होकारात रूपांतरित व्हायला लागलेला आहे. ज्यांनी पन्नास वर्षांपूर्वी धम्म घेतला त्यांचे शैक्षणिक, वाङ्मयीन, आर्थिक अशा क्षेत्रांमधील थक्क करून सोडणारे पराक्रम इतर बांधव पाहत आहेत आणि तेही आता दीक्षाभूमीकडे जायला निघाले आहेत. सगळ्याच उपेक्षितांच्या वाटा आता दीक्षाभूमीच्या दिशेने निघाल्या आहेत. लोक धम्मविहाराच्या मोहात पडत आहेत. काही पूर्वाश्रमीचे ब्राह्मण बांधव आहेत. मराठा बांधव आहेत. काहीत मुस्लिम बांधव आहेत. ओबीसी बांधव आहेत. भटक्या-विमुक्तांचा सागरही दीक्षाभूमीच्या दिशेने निघाला आहे. पूर्वाश्रमीचे मातंग बांधव, चर्मकार बांधव, भंगी बांधव हे समतेची तहान लागलेले सर्वच लोक आता बोधिवृक्षाच्या सावलीकडे निघाले आहेत. भोवती धर्मान्धतेचे जहरी ऊन आहे. दहशतवादाचे आणि मूलतत्त्ववादाचे निखारे जीवनावर सांडत आहेत. जागतिकीकरणाचे आणि फॅसिझमचे फास गरिबांच्या गळ्याभोवती आवळले जात आहेत. हे संकट एकूण मानवतेचाच गळा घोटणारे आहे आणि या महाअरिष्टातून वाचण्यासाठी लोक बोधिवृक्षाच्या मायकुशीत शिरू लागले आहेत.

ही ज्वलंत प्रक्रिया आहे. हे मूलगामी परिवर्तन आहे. बुद्धाच्या धम्माचा कार्यक्रम हा क्रांतीचा कार्यक्रम आहे. पण या क्रांतीचा माणसाच्या नेणिवेतील आणि जाणिवेतील परिवर्तनाच्या प्रेरणेवर विश्वास आहे. जगण्याच्या मूलभूत प्रवृत्तीवर विश्वास आहे. ज्यांना जगायचे आहे त्यांना जगवण्याचा कार्यक्रम हवाच असतो. जगण्याच्या संविधानातील हे मूलभूत कलम असते. मरणाची संस्कृती कोणी लोकांच्या मनावर कितीही लादली तरी लोक तिचा स्वीकार करीत नाहीत. लोकांना जगण्याची, सुखी आणि सुरक्षित जगण्याची, बंधुभावाने जगण्याची संस्कृती हवी असते.

धम्मक्रांतीच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने आज महाराष्ट्रात आणि देशात लोकांच्या मनातील जगण्याच्या संस्कृतीला अपूर्वशी भरती आलेली आहे. ही भरती आणखी विराट रूप धारण करणार यात शंका नाही.

धम्माने कधीय जातीय दंगली पेटवल्या नाहीत. धम्माने कधीही धार्मिक दंगली माजवल्या नाहीत. धम्माची शैली स्नेहशैली आहे. "करुणा विल सेव द वर्ल्ड" हेच धम्माच्या संविधानाचे प्रिअॅम्बल आहे. जगा आणि जगू द्या; परस्परांच्या हितासाठी जगा ! सामाजिक न्याय इतरांना द्या. सामाजिक न्याय मग तुमच्याही पाठीशी उभा राहील. धम्म हे सांगतो आहे. धम्मक्रांतीची पन्नास वर्षे आपली गुणवत्ता घेऊन उभी आहेत. धम्माबाहेरील लोकांना या गुणवत्तेचा मोह पडतो आहे आणि ते धम्माच्या चवदार तळ्याकडे धावत आहेत. बौद्धमयता ही मनुष्यमयताच आहे. ती माणुसकीच्या महाकाव्याचीच संहिता आहे. धम्म ही दुःखमुक्तीची कविता आहे. पन्नास वर्षांचा इतिहास साक्षीला आहे. धम्माकडे लाटालाटांनी निघालेल्या लोकांचे अनुभव साक्षीला आहेत. या सर्व साक्षी हे सांगत आहेत की धम्म या शब्दाचा अर्थच परिवर्तन असा आहे. घरात दिवा लावला की घर उजळते. तसा धम्म माणसांच्या मनात शिरला की त्या मनात माणुसकीच्या, समतेच्या आणि सहजीवनाच्या सौंदर्याचा उजेड फाकतो. 'भागो नही बदलो.' मरू नका. बदला. बदला आणि जगा. जगण्यासाठी, उज्ज्वल जगण्यासाठी लोकांना परिवर्तनाची गरज वाटू लागली आहे. स्वतःतील विघातक गोष्टी जाळण्याची गरज वाटू लागली आहे. जिंदगीनेच लोकांपुढे तसा पेच निर्माण केला आहे आणि लोक धम्म या नावाने वावरणाऱ्या विधायक परिवर्तनाशी नाते जोडत आहेत.

•••

४

आंबेडकरनिष्ठा प्रश्नांकित होण्याचे प्रसंग

१९५६ नंतरच्या पन्नास वर्षात आंबेडकर समाजाने पुष्कळ गोष्टी कमावल्या. १९५६ आधीच्या भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर केवळ पन्नास वर्षांमध्ये आर्थिक, वाङ्मयीन, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये या समाजाने केलेले पराक्रम थक्क करणारे आहेत हे या काळात त्याच्या हातून घडलेल्या काही चुका गृहीत धरूनही मान्यच करायला हवे.

या लेखात आंबेडकर समाजातील काही लोकांच्या निष्ठांतरांचा ओझरता विचार करावयाचा आहे. काही व्यक्तींच्या हातून या काळात अशा कृती घडल्या की त्यामुळे त्यांच्यातील आंबेडकरनिष्ठा शंकास्पद झाली. त्यामुळे एकुणच आंबेडकरी चळवळीत अविश्वासाचे, संभ्रमाचे आणि काही प्रमाणात तरी अंतर्विरोध-ग्रस्ततेचे वातावरण निर्माण झाले. अशा घटना समाजात घडल्या त्या त्या वेळी समाजात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

निष्ठा म्हणजे काय ? निष्ठेला जागणे म्हणजे काय ? तर दृढ विश्वास म्हणजे निष्ठा ! आपल्याला पटलेल्या मूल्यसरणीवर पक्का किंवा अढळ विश्वास म्हणजे निष्ठा ! या विवक्षित मूल्यसरणीचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. या मूल्यसरणीनेच आपणाला मानवत्वाशी आणि त्याच्या संपादनाने प्राप्त होणाऱ्या मुक्तीशी जोडलेले आहे. या सत्याचे कृतज्ञतापूर्वक भान बाळगणे म्हणजे निष्ठेला जागणे होय.

पण काही लोकांना निष्ठा या शब्दामधला आशयच कळत नाही. मग निष्ठेला जागताना त्यांच्या हातून चुका होतात. अशी माणसे मग आपल्या या चुकांचे उदात्तीकरण करीत राहतात. या चुकांचे एखादे अचूक तत्त्वज्ञान होऊन जाईल अशा भ्रमात ते वागतही राहतात. ही माणसेच मग आपल्या चुकांच्या मागे धावत राहतात किंवा या चुकाच या माणसांना आपल्यामागे फरफटत नेत असतात. या चुकांना ही माणसे प्रतिष्ठेचा विषय करतात आणि या चुका समाजाच्या हिताच्या कशा आहेत ते सांगत राहतात. हे खरे असते काय ? नाही. खरे नसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निष्ठेवर मोठा कटाक्ष होत. १४ जानेवारी १९४६ रोजी सोलापूर येथे झालेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर निष्ठेसंबंधी म्हणाले होते, "विद्वान, कर्तृत्ववान माणसे नसली तरी मला चालतील पण निष्ठेची माणसे हवीत. विद्येचा तुटवडा मी भरून काढण्यास खंबीर आहे.

जो विकला जातो, लोभाला बळी पडतो, त्याचा काही उपयोग नाही. (म. शासन, खंड १८-३) निष्ठेची माणसे हवीत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. असे का म्हणतात बाबासाहेब? हा प्रश्न त्याहीवेळी असला पाहिजे. माणसे इकडे-तिकडे भटकत असली पाहिजेत. वैचारिक शिस्तीला माणसे जुमानत नसली पाहिजेत. स्वार्थ, द्वेष आणि अहंकार यांच्यामुळे माणसे निष्ठेपासून दूर जातात. निष्ठाद्रोही होतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या निष्ठाशून्य लोकांचा त्रास होत असणे साहजिकच होते. कारण निष्ठाशून्य लोक संघटनेच्या दृष्टीने केवळ विघातकच असतात. खरे म्हणजे निष्ठा हे सूत्र असते. या सूत्रात चळवळ बांधली जात असते. संघटनेची भक्कम वास्तू निष्ठेच्या पायावरच उभी राहत असते. निष्ठा विकून कोणालाही संघटनेचा भाग होता येत नाही. बाबासाहेबांनी एक क्रांतीची चळवळ १९२० पासून सुरू केली. ही चळवळ मानवत्वाच्या प्रस्थापनेसाठी होती. ही चळवळ पुढे बुद्धाच्या बुद्धिवादापर्यंत आणि करुणेपर्यंत चालत गेली. या चळवळीला आता आपण आंबेडकरी चळवळ म्हणतो. क्रमाने आपण आंबेडकरी चळवळीचे तत्त्वज्ञान उभे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक साहित्यातूनच उभे केले. या तत्त्वज्ञानाला आपण आंबेडकरवाद असे म्हणतो. या तत्त्वज्ञानाच्या पायाभूत सूत्रांवर दृढ विश्वास असलेल्या आणि त्यानुसार आपल्या विचारांना दिशा देणाऱ्या आणि आचरण करणाऱ्या व्यक्तीला आपण आंबेडकरनिष्ठ व्यक्ती म्हणू शकू.

डॅनियल ओ'कॉनेल यांनी म्हटल्याप्रमाणे "कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही, कोणतीही स्त्री स्वतःच्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही. आणि कोणताही देश स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही." (१८–३, पृ. १७२) याच सूत्राची आपल्या विवेचनाच्या संदर्भात आणखी आपण एक पायरी मांडू शकतो. ही पायरी अशी : आंबेडकरवादाच्या पायाभूत सूत्रांची पायमल्ली करून कोणतीही व्यक्ती आंबेडकरनिष्ठ ठरू शकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानातूनच निष्ठेचे व्याकरण आपल्या हाती लागते. त्या व्याकरणाच्या नियमानुसार आंबेडकर समाजाने माणसांची आंबेडकरनिष्ठा निश्चित करावी.

धम्मक्रांतीनंतरच्या पन्नास वर्षात काही अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी घडलेल्या आहेत. या सर्वच गोष्टी वैचारिक शुद्धतेची पन्नास बाळगणारांना व्यथित करणाऱ्या आहेत. रिपब्लिकन पक्षाचे एकीकरण अजून होत नाही. होईल असेही कोणते चिन्ह दिसत नाही. साधी गोष्ट अशी की 'बुद्धं, धम्मं आणि संघं' मधील 'संघं' म्हणजे धम्मानुयायांचे संघटित रूपच होय. जी माणसे धम्म स्वीकारतात

ती संघटित होतातच. अमूक समाजातील माणसे संघटित नाहीत पण ती धम्माची उपासक आहेत असे म्हणताच येत नाही. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असे बाबासाहेबांनी सांगितले. संघटित मध्येही 'संघं' आहे. संघटित असण्याशिवाय आंबेडकरवादाच्या कुटुंबात प्रवेशता येत नाही. संघटित झाल्याशिवाय कोणालाही धम्माशी नाते जोडता येत नाही. माणसे संघटित का होत नाहीत ? कारण आहे तृष्णा ! आणि तृष्णेला येणाऱ्या स्वार्थ, अहंकार, परद्वेष या काटेरी फांद्या! म्हणजे स्वार्थ, अहंकार, परद्वेष या सर्व कजाग लेकी तृष्णेच्या आहेत. तृष्णाबाईच्या या अद्‌भुत लेकींनी आंबेडकर समाजात विलक्षण अराजक निर्माण केले आहे. माणसे 'संघं' होत नाहीत, माणसे संघटित होत नाहीत. त्याला कारण आहे तृष्णाबाई ! आणि ही तृष्णाबाई नष्ट होत नाही तोवर धम्माशी नाते जोडता येत नाही.

रिपब्लिकन पक्षातील फाटाफुटीने मी व्यथित आहे. त्यामागे कारणांचा हा गुंता आहे. विस्थापित माणसांमधील निष्ठा अधिक तीव्र असतात. माणसे नव्यानेच आर्थिकदृष्ट्या सुस्थापित होऊ लागली की त्यांच्यातील निष्ठा क्षीण होऊ लागतात. या माणसांच्या मनातील लढाऊपणा मावळत जातो. आंबेडकरी चळवळीच्या राजकारणात हे घडले.

आर.एस.एस.च्या सामाजिक समरसता मंचाचे ४ डिसेंबर १९८८ साली डॉ. गंगाधर पानतावणे यांनी पुण्याला उद्‌घाटन केले तेव्हाही मी व्यथित झालो. अस्वस्थ झालो. महाराष्ट्रातील सर्वच परिवर्तनवादी अस्वस्थ झाले. महाराष्ट्रातील शेकडो लोकांप्रमाणे मीही त्यांच्या या उद्‌घाटनावर टीका केली. कोणी समरसतेत गेले वा आरेसेसमध्ये गेले तरी माझे त्यामुळे व्यक्तिगत नुकसान काय आहे? हिंदू महासभा वा आरेसेस अशा प्रतिक्रियावादी संघटनांशी आम्ही संबंध ठेवणार नाही असे शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या जाहीरनाम्यातही बाबासाहेब सांगतात आणि पूर्ण धम्मच, पूर्ण आंबेडकरवादच तत्त्वतः आणि व्यवहारतःही या सर्व संघटनांच्या विरोधात उभा आहे. त्यामुळे मला आंबेडकरवाद मांडावा लागला. धम्माची पायाभूत तत्त्वे मांडावी लागली. समरसतेचे उद्‌घाटन आणि धम्म, समरसता आणि आंबेडकरवाद यातील मूलभूत अंतर्विरोध मांडावा लागला.

डॉ. भाऊ लोखंडे हे कुशाग्र बुद्धिमत्तेचे गृहस्थ आहेत. त्यांचा अभ्यास मोठा. वक्तृत्व प्रभावी पण त्यांनी ओशो रजनिशाला बुद्धपुरुष म्हटले. या नावाचे पुस्तकच त्यांनी लिहिले. ईश्वर, आत्मा मानणारा ओशो हे सर्वच न मानणाऱ्या बुद्धाशी नाते जोडूच कसा शकतो ? ओशोला बुद्धपुरुष म्हणणे हा तर्कप्रमाद आहे. याचा अर्थ हे भयंकर अतार्किक आहे. म्हणून हे संपूर्ण आंबेडकर समाजाची दिशाभूल करणारे प्रमेय खोडून काढण्यासाठी मला 'डॉ.

आंबेडकरांचा बुद्ध कोणता ?' ही पुस्तिका लिहावी लागली. डॉ. पानतावणे यांनी त्यांना शक्य असेल तर समरसतेचे उद्घाटन आणि धम्मसूत्रे, आंबेडकरवादाची सूत्रे यात तफावत नाही हे आजही समजावून सांगावे. मी त्यांच्यावर केलेली टीका परत घेईन. डॉ. लोखंडे यांनी 'बुद्धपुरुष ओशो' या आपल्या प्रमेयाशी आपण आजही एकनिष्ठ आहोत असे पुन्हा समजावून सांगावे. किंवा हे प्रमेय आता त्यांना मान्य नाही हे तरी सांगावे मला फार फार बरे वाटेल. 'बुद्धपुरुष ओशो' हे प्रमेय खोडून काढणाऱ्या माझ्या टीकेला कृतार्थता वाटेल.

विपश्यनेवर तर मी मूलगामी लेखन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली हे मी पुराव्यानिशी लिहिले. मुद्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वांचा आहे. खूप माणसे विपश्यना करू लागली, विपश्यनेचा पुरस्कार करू लागली त्यामुळे मी अस्वस्थ झालो आणि बाबासाहेबांचे सूत्र घेऊन मी अनेक ठिकाणी विपश्यनेवर लिहिले.

२२ प्रतिज्ञा मला मान्य नाही म्हणणाऱ्या लक्ष्मण मानेंवर मी लिहिले. 'मी श्रीगणेशाचा उपासक आहे' म्हणणाऱ्या डॉ. नरेंद्र जाधवांवर लिहिले. 'भीमशक्ती आणि शिवशक्ती' यांच्या युतीचा पुरस्कार करणाऱ्या डॉ. रावसाहेब कसब्यांवर लिहिले. 'भारत बौद्धमय करण्याचे डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न गोयंकाच पूर्ण करू शकतात' म्हणणाऱ्या रा.सू. गवईंवर लिहिले. परखडपणे लिहिले. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या गोष्टी नाकारल्या त्या गोष्टींना कोणी जवळ करू लागले की मला फार यातना होतात आणि मी लिहितो. बांधीलकीला विरोध करणाऱ्या आणि कलावादाची वकिली करणाऱ्या प्रा. गंगाधर गाडगीळांवर आणि व्यंकटेश माडगुळकरांवर मी तेवढ्याच परखडपणे लिहिले. निळूभाऊ फुल्यांचे 'मी आता आस्तिक व्हायला लागलो' असे वक्तव्य वर्तमानपत्रात आले आणि मी त्यांना प्रदीर्घ पत्र लिहिले. मी महायान्यांच्या विराधी लिहिले. प्रखरपणे लिहिले.

जिथे जिथे आंबेडकरनिष्ठा अवमानिली जाते असे वाटले, जिथे कुठे तात्विक अंतर्विरोध मला दिसला तिथे तिथे मी लिहिले. माझे या अंतर्विरोधामुळे काही व्यक्तिगत नुकसान होत होते काय ? नाही. असे माझे काहीही नुकसान होत नव्हते. पण लोकांचा राग ओढवून घेत मला तत्त्वांच्या ठाकुरकीसाठी लिहावे लागले. या लेखनामागे कोणाच्याही अवमानाचा हेतू नव्हता तर आंबेडकरवादाच्या, धम्माच्या तत्त्वांच्या सन्मानाचा हेतू होता. त्या त्या वेळी संबंधित माणसे रागावली. पुढेही रागावतील पण अचूक म्हणून इतिहास माझ्याच पाठीशी उभा राहील ही खात्री मात्र मला निश्चित आहे.

५

आदर्श बौद्धत्व : एक सौंदर्यसोहळा

आदर्श बौद्धत्व म्हणजे सम्यक बौद्धत्व ! पूर्ण प्रकाशित बौद्धत्व म्हणजे सम्यक् बौद्धत्व ! चंद्राचे परिणत रूप म्हणजे पौर्णिमा. त्याप्रमाणे आदर्श बौद्धत्व म्हणजे बौद्धत्वाची पौर्णिमा. मानवी व्यक्तित्वाच्या चांगुलपणाची परिसीमा म्हणजे आदर्श बौद्धत्व. बुद्धिवाद आणि करुणा यांचे सम्यक् आणि सेंद्रिय आचरण म्हणजे आदर्श बौद्धत्व.

पंचशीलाचे मूर्तिमंत आचाररूप, तृष्णामुक्त आणि अहंकारमुक्त मनाचे स्वाभाविक जगणे म्हणजे आदर्श बौद्धत्व. जाती, धर्म, वर्ण, वर्ग अशा सर्व खोळी गळून पडल्यानंतर उरते ते निखळ, विशुद्ध आणि पूर्ण पारदर्शक माणूसपण म्हणजे आदर्श बौद्धत्व. हीच प्रबुद्धता होय. हीच निब्बाणमनस्कता होय.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्मक्रांतीप्रसंगी दिलेल्या ऐतिहासिक भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते - "..... मात्र तुमचीही जबाबदारी मोठी आहे. तुमच्याबद्दल इतर लोकांना आदर वाटेल, मानसन्मान वाटेल अशी तुम्ही कृती केली पाहिजे."

या अवतरणातील प्रत्येकच शब्द महत्त्वाचा आहे. 'मोठी जबाबदारी' असे जिला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात तिचे स्वरूप काय आहे ते एकदा नीट मांडले पाहिजे. इतरांना बौद्ध माणूस आदरणीय वाटला पाहिजे आणि सन्माननीय वाटला पाहिजे. पण या आदराचे आणि सन्मानाचे स्वरूप काय असावे तेही मनाशी स्पष्ट करून घेतले पाहिजे.

प्रज्ञावंताचा आणि करुणावंतांचा समाज म्हणजे बौद्धसमाज होय. 'एतं बुद्धानुशासनम्' मधील बुद्धाचे अनुशासन ज्या समाजात पाळले जाते तो समाज म्हणजे आदर्श बौद्ध समाज होय. बौद्ध समाजाला 'धर्म' नाही. तो कोणता 'धर्म' मानीतच नाही. त्यामुळे धर्माशी संबंधित ईश्वर, स्वर्ग, मोक्ष अशा कोणत्याही गोष्टी तो मानत नाही. या सर्वच गोष्टी मानणारे इतर सर्वच 'धर्म' मूलतत्त्ववादी आहेत. ते मूलतत्त्ववादी आहेत याचा अर्थ आपण मानतो ती ही सर्वच तत्त्वे चिरंतन महत्त्वाची असून इतरांनी ती मान्यच केली पाहिजेत असे या सर्वच

मूलतत्त्ववादी धर्मांना वाटते. धर्म परस्परांशी प्रेमाने वागूच शकत नाहीत. त्यांच्यातील भांडण आणि रक्तपात अपरिहार्यच आहे याचे कारण हे की त्यांची मूलतत्त्वे गाडीच्या रुळांसारखी असतात. हे रूळ जसे एकत्र येत नाहीत त्याप्रकारे या धर्मांची मूलतत्त्वे एकत्र येवू आणि सलोख्याने नांदूच शकत नाहीत.

धम्माजवळ अशी मानवी जीवनाला विनाशाकडे नेणारी कोणती मूलतत्त्वेच नाहीत. निरामय माणुसकीकडे आणि वैज्ञानिक सत्याकडे जाणारे सर्व मार्ग बुद्धाने पूर्णतः मोकळे ठेवलेले आहेत. असत्यांचा पराभव व्हायलाच हवा. पण असत्यांचा पराभव सत्यानेच करायला हवा. अंधश्रद्धांचा पराभव व्हायलाच हवा आणि अंधश्रद्धांचा पराभव शुद्ध विवेकानेच व्हायला हवा. विषमतेचा पराभव व्हायलाच हवा आणि विषमतेचा पराभव समतेनेच करायला हवा. तृष्णेचा पराभव तृष्णामुक्त मनानेच शक्य आहे. अहंकारमुक्त मनच अहंकाराचा पराभव करू शकते आणि अनिष्टांचे हे सर्व पराभव माणसाच्या विजयासाठी आवश्यकच आहेत. पण ही विजयाची प्रक्रिया मानसिक स्थित्यंतराशी निगडित आहे. या विजयाकडे जाण्याला विरोध करणारी व्यक्तीच्या मनाची घटना बदलायला हवी. या संदर्भात अत्यंत उपयुक्त ठरू शकणारा बुद्धाचा 'अंगुलीमाल पॅटर्न' लक्षात घेण्याची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांवर मोठी जबाबदारी आहे. ही जबाबदारी बुद्धाला कसा माणूस अभिप्रेत होता ते समजावून घेण्याची आहे. याचाही अर्थ बुद्ध नीट समजावून घेण्याची जबाबदारी हीच पहिल्या पातळीवरची मोठी जबाबदारी आहे असे मानले पाहिजे. ही जबाबदारी समजावून घेतांना हे लक्षात घ्यायला हवे की खरे कसोटीचे प्रसंग पुढेच आहेत.

बुद्धिवाद, विज्ञानवाद आणि समता या धम्माच्या पायाभूत तत्त्वांच्यानुसार वागणाराला आदर आणि सन्मान मिळायला हवा आणि हा आदर आणि सन्मान बुद्धिवाद, विज्ञानवाद आणि समता या धम्माच्या पायाभूत तत्त्वांच्यानुसार वागणारांकडूनच केवळ नव्हे तर यांच्या व्यतिरिक्ताच्या लोकांकडून तो आदर आणि सन्मान मिळायला हवा. हे कसे शक्य आहे ? हे शक्य आहे काय ? इथून खरे म्हणजे पेच सुरू होतो. आदर किंवा सन्मान मिळायची एक सोपी पद्धती असते. पुढल्या व्यक्तीच्या आदर्शांच्यानुसार आपण वागायला लागलो तर पुढल्या व्यक्ती आपणाला आदर आणि सन्मान देतात. इथे प्रश्न असा आहे की पुढील व्यक्तीचे आदर्श आपल्याला मान्यच नाहीत आणि आपले आदर्श पुढील व्यक्तींना मान्यच नाहीत. अशा परिस्थितीत काय करणार असा प्रश्न

आहे. आपल्याला मूलतत्त्ववाद्यांचे आदर्श स्वीकारायचे नाहीत आणि तरीही त्यांना आपले वागणे आदरणीय आणि सन्माननीय वाटले पाहिजे. हे कसे होणार ? पण हे होऊ शकते. बाकी धर्मांमधील मूलतत्त्ववादाच्या उपासकांना आपल्या वागण्याचा इतका चांगला अनुभव यायला हवा की त्यांना आपल्या वागण्याचा मोह पडायला हवा. त्यांना असे वाटायला हवे की, ही माणसे ईश्वर मानीत नाहीत. स्वर्ग वा विषमताही मानीत नाहीत आणि तरीही किंवा त्यामुळेच ही माणसे इतके चांगले वागू शकतात. समाजात सहभाव, सद्भाव, शांतता आणि सुरक्षितता असण्यासाठी या माणसांचे वागणेच आवश्यक आहे असे या सर्व लोकांना वाटले पाहिजे.

आपल्या वागण्यासंबंधीचा आदर म्हणजे आपल्या निर्व्यसनीपणासंबंधीचा आदर असला पाहिजे. वागण्यातील चांगुलपणा ही मोठी शक्तीशाली गोष्ट आहे असे सर्वच लोकांना वाटले पाहिजे आणि कधीतरी या वेगवेगळ्या मूलतत्त्ववादी लोकांना असे वाटले पाहिजे की या बौद्धांचे हे आदर्श मानवी वागणे त्यांच्या बुद्धीवादी आणि करुणामय तत्त्वज्ञानावर अपरिहार्यपणे उभे आहे. हे क्रमाने होईल. क्रमाने हे होईलच. कारण अंतिम विश्लेषणात आपल्याला माणसातील सुप्त विवेकशीलतेवर विश्वास ठेवावाच लागतो. सुखाने जगण्याच्या त्याच्या भुकेवर विश्वास ठेवावाच लागतो. आदर्श बौद्धत्वाचे स्वप्न आपण पाहू शकतो, विश्वाच्या बौद्धमयतेचे सुंदर स्वप्न आपण पाहू शकतो. त्यामागेही माणसाच्या मनातील जीवनेच्छा आणि विवेकशीलता याच गोष्टी असतात.

आदर्श बौद्धत्वाच्या स्वप्नाला मानवी मनातच मूलतः स्थान आहे. मानवी मनाचे तेच मूलभूत वास्तवही आहे आणि तीच त्याची गरजही आहे. इतर विध्वंसक गोष्टींनी ते मूलभूत वास्तव आणि ती गरज या गोष्टी धुसर केल्या तरी त्या नष्ट कधीच होत नसतात. आदर्श बौद्धत्वाचे स्वप्न कधीतरी वास्तव होतेच. माणसाचे मन जेव्हा निखळ माणूस होते तेव्हा हे मनच बौद्धत्व या वास्तवानेच फुलत राहते. जाती, धर्म अशा अनेक गोष्टींनी या वास्तवाला हद्दपार करीत नेले. ते वास्तव धुसर झाले. आता परत या वास्तवाचे स्वप्न आपण पाहत आहोत. आदर्श बौद्धत्वाचे स्वप्न आपण पाहत आहोत. या स्वप्नाला पूर्वी होते त्याप्रमाणेच सुंदर वास्तवत्व देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत.

•••

६

अत्तदीपत्वाची कार्यशाळा

दीप ही तेजाची निर्मितीशाळा आहे. तेजाला आपण एक अथांग प्रतीकार्थ दिला आहे. सत्याला आपण तेजाच्या रूपात पाहतो. प्रकाशाचे आपण सौंदर्याशी नाते जोडून टाकलेले आहे आणि उजेडाची आपण चांगुलपणाशी किंवा इष्टाशी नेहमीसाठी गाठ बांधून टाकलेली आहे. तेजाचे आपण याप्रकारे परिवर्तनाशी आणि क्रांतीशी संबंध प्रस्थापित करून टाकलेले आहेत.

एकूण मानवी जीवनातील उजेडाचे महत्व सर्वज्ञात आहेच. जगभरच्या मानवी प्रतिभांनी उजेडावर कविता लिहिल्या आहेत. अशा सर्वच कवितांमधून उजेडाला न्यायाच्या आणि समतेच्या रूपात पाहिलेले आहे याप्रकारे जीवनातील प्रत्येकच चांगल्या गोष्टीला आपण उजेडाशी जोडलेले आहे.

मानवी जीवनातील परिपूर्णतेला आपण उजेड म्हणतो. मानवी व्यक्तित्वाच्या प्रकाशनाला आपण उजेड म्हणतो. समतेचा पुरस्कार करणाऱ्या शब्दांना आपण उजेड वाटणारे शब्द म्हणतो. बंधुत्वासाठी जीव पाखडणाऱ्या शब्दांना आपण उजेडाचा सडा शिंपणारे प्रकाशग्रह म्हणतो.

माणसाचे मन समतेने, स्वातंत्र्याने, बंधुतेने आणि सामाजिक न्यायाने भरून जाणे म्हणजे माणसाचे मन दीपंकर होणे ! माणसाचे मन स्वयंप्रभ होणे. माणसाचे मन स्वयंपूर्ण होणे म्हणजे माणसाचे मन अत्तदीप होणे. आपला उजेड आपणच होणे, आपला मार्गही आपणच होणे आणि त्या मार्गावरील आपला दीपही आपणच होणे असा अत्तदीपचा अर्थ आहे.

उजेडाचा संबंध आपण ज्ञानाशी जोडतो. ज्ञान हे सूर्यासारखे आहे. ज्ञान हे उजेडासारखे आहे. ज्याचे अस्तित्व प्रस्थापित झाले की अज्ञान उरत नाही त्याला ज्ञान म्हणतात. ज्याचे अस्तित्व प्रस्थापित झाले की अंधार उरत नाही त्याला प्रकाश म्हणतात. त्यामुळे अत्तदीपत्व हा मानवी व्यक्तिमत्त्वाचा पूर्णांक मानला जातो.

कोणत्याही दिव्याचा प्रकाश हा त्या विशिष्ट दिव्यापुरता राहत नाही. एका दिव्याचा प्रकाश अवतीभवतीचा अवकाश उजळून टाकत असतो. या ना त्या कारणाने विझून पडलेल्या दिव्यांना उजळून टाकणाऱ्या प्रेरणा फुलवीत असतो. ही प्रक्रिया उजेडाचे अनुसरण करणारी, उजेडाचा पुरस्कार करणारीच प्रक्रिया असते.

अत्तदीपत्वाची प्रक्रिया ही तेजाकडून तेजाकडे चाललेली, उजेडाकडून उजेडाकडे चाललेलीच प्रक्रिया असते. ज्याच्या हातात उजेड आहे तो अंधाराकडे जातच नाही. कारण उजेड अंधाराला नष्ट करीतच पुढे जात असतो. जी व्यक्ती स्वतःच दीप झालेली आहे त्या व्यक्तीसाठी अंधार कायम संपलेलाच असतो. अशा व्यक्तीची अंधाराशी कधीही गाठभेट पडत नाही.

'अत्तदीप व्हा.' स्वतःचा दीप स्वतःच व्हा असे एक सूर्य सांगतो. याचा अर्थ तो स्वतःच अत्तसूर्य झालेला असतो हा असतो. इतरांना अत्तदीप व्हा असे सांगण्याचा अधिकार त्यालाच असतो जो अत्तदीप वा अत्तसूर्य झालेला असतो. बुद्ध स्वतःच एक अत्तसूर्य झाला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असेच एक अत्तसूर्य झाले होते. हे अत्तसूर्य आपल्याला अत्तदीप व्हायला सांगताहेत याचा अर्थ कोणाच्या फुंकरीने, कोणी पुढे केलेल्या आमिषाने किंवा अशाच छोट्या-मोठ्या वाऱ्यावादळाने विझून जाणारे दिवे होऊ नका असे ते सांगताहेत.

समाजात वास्तव असे असते की सहसा लोक दीप होण्याचे टाळतात. त्याहून ते अत्तदीप होण्याचे टाळतात. का टाळतात ? तर जबाबदाऱ्या येतात म्हणून आणि लोकांना सगळ्यात जास्त कंटाळा जबाबदाऱ्यांचा येतो. जबाबदाऱ्या टाळू इच्छिणारांना अत्तदीपत्व टाळावे लागते. पण अत्तदीप होण्याचा अर्थ खऱ्या अर्थाने प्रज्ञावंत आणि करुणामय होणे असाच असतो. ही घडणही अत्यंत मजबूत असावी लागते. अत्तदीप होणे याचा अर्थ आपण स्वयंपूर्ण होणे असा आहे पण इतरांना अत्तदीप करण्यासाठी झटणे असाही अत्तदीपत्वाचा अर्थ आहे.

अत्तदीप व्हा ! हे सुंदर मानवी अस्तित्वाचेच तत्त्वज्ञान आहे. ज्याने त्याने स्वतःचा दीप व्हावे याचा अर्थ कोणीही परप्रकाशित ग्रहासारखे राहू नये असा आहे. इतर कोणा ग्रहाच्या उजेडात प्रकाशित होणारे ग्रहही हे इतर ग्रह दूर गेले की काळवंडून जातात. म्हणून अत्तदीप व्हायला हवे. आपले प्रकाशणे इतरांवर अवलंबून असता कामा नये. आपले प्रकाशणे हे आपलेच असले पाहिजे. असे झाले तरच मग आपण उजेडात राहू !

प्रत्येक व्यक्तीला स्वतःची वाट स्वतःच काढावी लागते. स्वतःची दिशा स्वतःच निर्धारपूर्वक ठरवावी लागते आणि आपल्या मानवी व्यक्तित्वाच्या पूर्णत्वाच्या ध्येयाकडे स्वतःलाच जावे लागते. इथे कोणाकडून घेतलेले उधार उजेड चालत नाहीत. इतरांच्या चांगुलपणाची चर्चा उपयोगाची नसते. स्वतःच चांगले होऊन दाखवावे लागते. अत्तदीपत्वाचा हा अर्थ आहे. आणि अत्तदीपत्व हा माणुसकीच्या कार्यशाळेचाच आवश्यक अभ्यासक्रम आहे.

•••

७

दीक्षाभूमी : माणुसकीचे विद्यापीठ

१९५६ पासून दीक्षाभूमी हा एक अपूर्व शब्द सतत कानावर पडतो आहे. भारतातल्या आणि जगातल्याही अक्षरशः कोटयवधी लोकांच्या वाणीतून हा सुंदर शब्द रुणझुणतो आहे. हजारो साहित्यिकांच्या लेखनातून दीक्षाभूमी या शब्दाने कायम नक्षत्रांचा खेळ मांडलेला आहे.

दीक्षाभूमीचा जन्म १९५६ साली झाला. दीक्षाभूमीच्या जन्माचा विशेष हा की दीक्षाभूमीचे नामकरण आधी झाले आणि स्वतःचे नाव निश्चित केल्यानंतर दीक्षाभूमी जन्माला आली. दीक्षाभूमी ही संकल्पनाच नवीन आहे. बुद्धाने असंख्य व्यक्तींना वेळोवेळी धम्मदीक्षा दिली. वेगवेगळ्या ठिकाणी दिली. पण त्या काळात आज जिला आपण दीक्षाभूमी म्हणतो तशी दीक्षाभूमी जन्माला आली नाही. अशोकाच्या काळात तर धम्माचा प्रसार फारच मोठ्या प्रमाणात झाला. याच काळात भारत बौद्धमय झाला होता. अशोकाने स्वतः दीक्षा घेतली. इतर अनेकांना दीक्षा दिली पण दीक्षाभूमी ही संकल्पना त्याही काळी जन्माला आली नाही. दीक्षा दिली जात होती. विशिष्ट ठिकाणीच दीक्षा दिली जात होती पण आज दीक्षाभूमी ही संकल्पना ज्याअर्थाने आपल्या सांस्कृतिक जीवनात वावरते तशी १९५६ पूर्वीच्या काळात ती वावरत नव्हती असेच दिसते.

वेगवेगळ्या नावांनी आणि वेगवेगळ्या पद्धतींनी इतर धर्मांचेही दीक्षासमारंभ होतात. असे दीक्षासमारंभ खूपदा झालेलेही आहेत पण दीक्षाभूमी या इतर धर्माच्या लोकांनाही जन्माला घालता आली नाही. दीक्षाभूमी १४ ऑक्टोबर १९५६ साली जन्माला आली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिभेपोटी ती जन्माला आली.

इथे क्रांतीनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना त्यांनी दीक्षा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्म घेतला. जगात धर्माचे एक कुटुंब आहे. या कुटुंबातील प्रत्येकच धर्म दुसऱ्याशी भांडत आहे. हे कुटुंब ईश्वरवादी धर्मांचे आहे. या प्रत्येकच धर्माला आपापला मूलतत्त्ववाद आहे. या धर्मांमधली भांडणे त्यांच्या मूलतत्त्वांमधली भांडणे आहेत. ही भांडणे थांबणे शक्य नाही. या भांडणांना

विश्रांती मान्य नाही. हे धर्म इतिहासभर परस्परांशी भांडलेले आहेत. मानव समाजाचे रक्त या धर्मांनी खूपदा सांडवले आहे. पृथ्वी रक्ताने खूपदा भिजली आहे. या धर्मांनी पृथ्वीला खूपदा सामूहिक मरणांच्या भेटी दिलेल्या आहेत आणि आजचा काळ तर विज्ञानाच्या प्रकर्षाचा काळ आहे. या मूलतत्त्ववाद्यांनी अत्यंत भयानक अशी शस्त्रास्त्रे जन्माला घातलेली आहेत आणि पूर्वी कधीतरी महायुद्धे होत. आता महायुद्धे विभागली गेली आहेत. ही छोटी छोटी युद्धे दररोजच पृथ्वीला रडवत आहेत. पृथ्वीवरील माणसांच्या चिंध्या करीत आहेत. बॉम्बस् फुटत नाहीत असा दिवस आता पृथ्वीवर उगवत नाही. भारतात ठिकठिकाणी बॉम्बस् फोडले जातात. हे स्फोट कधी या भागात होतात. कधी त्या भागात होतात. हे बॉम्बस्फोट कधी पाकिस्तानात होतात. इराण, इराक, अफगानीस्थान इथे होतात. जगातल्या प्रत्येकच राष्ट्रात आणि जगाच्या सगळ्याच भागात हे स्फोट होतात. एका महायुद्धाने व्हावी एवढी प्राणहानी आणि वित्तहानी दर पंधरा दिवसांमधील या बॉम्बस्फोटामळे पृथ्वीच्या पाठीवर होते. या छोट्या छोट्या युद्धांचे मिळून दर पंधरा दिवसाला एक महायुद्ध मानले तर पृथ्वी दर महिन्याला दोन महायुद्धांच्या वणव्यात जळते आहे असे म्हणावे लागेल.

द्वेष, तृष्णा, अहंकार यांच्या महाकाय लाटा जगात उसळत आहेत आणि या सर्व लाटांचे आयोजन धर्म करीत आहेत. धर्मांचे मूलतत्त्ववाद करीत आहेत. सगळी दुनियाच आता मरणाच्या जवळ ढकलली जात आहे. हा धर्म येतो आणि दुनियेला स्मशानात ढकलण्याचा प्रयत्न करतो. कधी तो धर्म येतो आणि दुनियेला विनाशाच्या दरीकडे खेचत राहतो.

आज मानवी जीवनाला मृत्यूघराचे रूप प्राप्त झालेले आहे. महायुद्धे किती प्रकारची सांगावीत ? तृष्णेचे भयानक महायुद्ध पेटले आहेच. अहंकाराचे भयानक महायुद्ध पेटले आहेच आणि या महायुद्धांनी दुनियेत मरणांचा सडा शिंपायला प्रारंभ केला आहे.

सगळ्या दुनियेतील धर्म एका बाजूला आणि या विस्फोटक पर्यावरणात धम्म एका बाजूला असे चित्र आज दिसत आहे. इतर धर्म आणि त्यांचे मूलतत्त्ववाद त्यांची कामे करीत आहेत. पृथ्वीचे स्मशान करण्याचे ते काम होय. या धर्मांनी माणसांना वेठीला धरले आहे. या धर्मांनी माणसांमध्ये परस्परांचे रक्त पिण्याची तहान चेतवली आहे. एका धर्माची माणसे दुसऱ्या धर्माच्या माणसांना काळ्या पाण्यात पाहत आहेत. काही धर्मान्ध माथी बेबंद झाली आहेत आणि

ही माणसे हृदयांचा संबंधच तोडून टाकत आहेत. इथे फक्त ज्याला जगायचे आहे तो सिधासाधा माणूस मात्र मरणासाठी सोपा झाला आहे.

या सर्व मरणपर्वात धम्मावर फार मोठी जबाबदारी आहे. दीक्षाभूमीने आता जगाच्या पाठीवर ज्यांना ज्यांना शांतपणे जगायचे आहे त्यांच्या पाठीशी धम्माचे बळ घेऊन उभे राहयचे आहे.

क्रांतीनायकाने दीक्षाभूमी जन्माला घातली त्याचे हे कारण आहे. दुनियेच्या आजच्या भयानक मृत्यूपर्वात दीक्षाभूमीला उज्ज्वल जीवनाची भूमिका करायची आहे. क्रांतीनायकाला जागतिक महायुद्धांचे परिणाम माहीत होते. क्रांतीनायकाला बॉम्बस्फोटांनी हिरोशिमा-नागासाकीची केलेली राख माहीत होती. दुसऱ्या महायुद्धाने दुनियेची कशी वाताहत केली हे क्रांतीनायकाला माहीत होते. मुळात धम्माचा जन्म युद्धाला पर्याय म्हणूनच झाला होता. तृष्णा मारली नाही तर ती दुनियेला मारील. तृष्णेला नष्ट केले नाही तर ती माणसालाच नष्ट करील.

यावेळी दीक्षाभूमीची जबाबदारी अधिकच वाढते. पुढे दीक्षाभूमीची गरज अधिकच वाढणार आहे हे क्रांतीनायकाला मालूम होते. म्हणून क्रांतीनायकाने दीक्षाभूमी निर्माण केली. हृदय ही दीक्षाभूमीची मातृभाषा आहे. Love will save the world ही दीक्षाभूमीची भूमिका आहे. दीक्षाभूमी ही माणुसकीच्या निर्माणाची आणि संवर्धनाची भूमी आहे.

क्रांतीनायकाला सामाजिक न्यायाचे विद्यापीठ स्थापन करावेसे वाटले आणि त्याने दीक्षाभूमी निर्माण केली. युद्धाची आग विझविणारा चांदण्याचा पाऊस निर्माण करावा असे क्रांतीनायकाला वाटले आणि क्रांतीनायकाने दीक्षाभूमी निर्माण केली. सगळ्याच जळल्या-तापल्या श्वासांना पोटाशी घेणारा वैश्विक बोधिवृक्ष निर्माण करावा असे वाटले आणि क्रांतीनायकाने दीक्षाभूमी निर्माण केली. उगवेल पण कधीच मावळणार नाही असा सूर्य निर्माण करावा असे वाटले आणि क्रांतीनायकाने दीक्षाभूमी निर्माण केली. विश्वकरुणेचा अभ्यासक्रम निर्माण करावा असे क्रांतीनायकाला वाटले आणि त्याने दीक्षाभूमी निर्माण केली. तृष्णेची हरळी मुळापासून उपटून काढणारे एक अभियान निर्माण करावे असे क्रांतीनायकाला वाटले आणि त्याने दीक्षाभूमी निर्माण केली. शांततेने आणि सुखाने जगण्याची दीक्षा देणारे क्रांतीकाव्य जन्माला घालावे असे वाटले आणि क्रांतीनायकाने दीक्षाभूमी निर्माण केली. दीक्षाभूमी हे बुद्धाच्या बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचे वर्णन आहे. दीक्षाभूमी या शब्दाचा अर्थच करुणा आणि प्रज्ञा असा आहे. दीक्षाभूमी या शब्दाचा अर्थच बुद्ध असाही आहे आणि आंबेडकर असाही आहे.

दीक्षाभूमी या शब्दाचा अर्थ सर्वकल्याणकारी सांस्कृतिक समाजवाद असाच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षाभूमी या नावाने उजेडाचा महोत्सव १९५६ साली सुरू केला.

ज्या नेतृत्वाला दीक्षाभूमी या शब्दाचा अर्थ कळेल ते नेतृत्व दीक्षाभूमीला तीर्थभूमी होऊ देणार नाही. ते नेतृत्व दीक्षाभूमीला यात्राभूमी होऊ देणार नाही. ते नेतृत्व दीक्षाभूमीला व्यापारभूमी होऊ देणार नाही. या नेतृत्वाला हे कळेल की असे करणे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उद्देशाचाच अवमान करणे ठरेल. मागल्या पन्नास वर्षात दीक्षाभूमीला खूपदा आपल्या जन्महेतूच्या विपर्यासाचे दुःख भोगावे लागले. दीक्षाभूमी तिला गौरव वाटेल अशा नेतृत्वाची वाट पाहत आहे. खऱ्या आंबेडकरनिष्ठ नेतृत्वाकडे दीक्षाभूमी डोळे लावून बसली आहे. या नेतृत्वाच्या वाटेवर ती डोळे अंथरून बसली आहे. दीक्षाभूमीचे हे स्वप्न पूर्ण व्हावे. दीक्षाभूमी सर्वच पाखरांना पोटाशी घेणारा विशाल बोधिवृक्ष व्हावी. दीक्षाभूमी माणुसकीचे विद्यापीठ व्हावी. दीक्षाभूमी ही दीक्षाभूमी व्हावी. दीक्षाभूमी भीमाई व्हावी ...!

•••

८

बुद्ध आणि आंबेडकर

क्रांतीनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' अशी तुलना केली. या तुलनेत बुद्ध आणि मार्क्स यांच्या विचारांमधील साम्यस्थळे जशी डॉ. आंबेडकरांनी मांडून दाखविली त्याप्रमाणे विरोधस्थळेही मांडून दाखविली. एका भाषणात त्यांनी रानडे, गांधी आणि जीना यांचीही तुलना केली. त्यांनी केलेल्या कार्याचे आणि विचारांचे त्यांनी तौलनिक विवेचन केले. 'बुद्ध आणि आंबेडकर' या लेखात आपणाला बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तुलना अभिप्रेत नाही. या लेखात आपणाला त्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वांमधील साम्ये समजावून घ्यायची आहेत.

बुद्ध आणि आंबेडकर हे दोघेही भारताचे सर्वश्रेष्ठ आणि महान सुपुत्र आहेत. भारताच्या बौद्धिक पराक्रमाचे सर्वश्रेष्ठ पुरावे म्हणून कोणाही जाणत्या माणसाला या दोघांचीच नावे सन्मानाने पुढे करावी लागतील. नागवंशाचे सर्वश्रेष्ठ प्रज्ञापुरुष असेच दोघांचेही वर्णन करावे लागेल.

या अध्यात्मवादी आणि देव-दैववादी देशात एक समृद्ध जडवादी आणि समतावादी परंपरा आहे. चार्वाक, बुद्ध, आंबेडकर असा तिचा गौरवशाली चढता आलेख आहे. चार्वाक, बुद्ध, आंबेडकर ही बुद्धिवादी विचारपरंपरा या देशात अस्तित्वात नसती तर या देशाला बौद्धिक जीवनापासून आणि समतेच्या स्वप्नापासून वंचितच राहावे लागले असते. वैचारिक कणा नसलेला समाज असे अचूक वर्णन या समाजाचे इतर देशांमधील लोकांना मग सहज करता आले असते.

बुद्ध आणि आंबेडकर या विचारपरंपरेने या देशाला परिवर्तनाचे मानसशास्त्र दिले. गतीचे आणि प्रगतीचे भान दिले. एका ठिकाणी सडत राहणे ही विकृती आहे आणि सामाजिक न्यायाचे वास्तव निर्माण करण्यासाठी झटत राहणे ही संस्कृती आहे हे या महान विचारपरंपरेने या देशाला सांगितले. विचार करा, चिकित्सा करा, अधिकाधिक विशुद्ध व्हा. एकमेकांसंबंधीचा सद्भाव हा सामाजिक न्यायाचा आधार आहे. इतरांचे शोषण करणारी वृत्ती, इतरांकडे उण्या नजरेने पाहणारी वृत्ती आणि अंधश्रद्ध वृत्ती; या वृत्ती ज्या समाजात असतात त्या समाजात माणुसकी नावाची गोष्टच संभवत नाही. बुद्ध-आंबेडकर या विचारपरंपरेने सतत क्रांतीविचाराची दीक्षा दिली.

बुद्ध आणि आंबेडकर हे दोघेही अपूर्व प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे धनी होते. हजारो वर्षांमध्ये क्वचितच कोणाला मिळते अशी सतत काही नवे निर्माण करू शकणारी प्रज्ञा दोघांनाही लाभली होती. दोघांच्याही प्रज्ञांचे वर्णन युगप्रज्ञा असेच करावे लागेल.

दोघांमध्येही अजोड असा मनस्वीपणा होता. डोक्यात एखादा ध्यास घेणे, मनात एखादे स्वप्न घेणे आणि स्वतःच्या प्रकृतीची, संसाराची कोणतीही पर्वा न करता त्या ध्येयामागे जिवाला आग लागल्याप्रमाणे धावत राहणे या वृत्तीला दोघांनीही आपली जीवनशैली मानले होते. युद्धाला पर्याय शोधण्याच्या, तृष्णेला पराभूत करण्याच्या ध्यासाने सिद्धार्थ पेटला होता. सयाजीराव गायकवाडांनी विचारलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरात भीमराव नावाचा तरुण म्हणाला होता समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि सार्वजनिक अर्थशास्त्र या सर्व शास्त्रांचा अभ्यास करून मला या देशातील लोकांना गुलामीतून मुक्त करायचे आहे. त्यासाठी मला उच्च शिक्षण घ्यावयाचे आहे. बुद्ध आणि आंबेडकर हे दोन्ही ध्यास दुनियेच्या सुखासाठी होते आणि बुद्ध-आंबेडकर या दोघांमध्येही जगासाठी व्यक्तिगत सुखांची होळी पेटविण्याची ताकद होती. या बाबतीत दोघांच्याही वृत्तीमधले साम्य कोणालाही थक्क करील असेच आहे.

दोघांनीही आयुष्यभर तत्त्वासाठी महायुद्धे केली. संपूर्णच अध्यात्मवादी आणि विषमतावादी प्रणालीला दोघांनीही प्रखर बुद्धिवादाच्या जोरावर खोडून काढले. त्यासाठी दोघांनीही वापरलेली तर्कपद्धती अत्यंत ज्वलंत आहे. माणूस हा त्यांनी तत्त्वचिंतनाचा प्रमुख विषय मानला. माणसाची अर्थपूर्णता अधिकाधिक समुन्नत होत जावी यासाठी दोघांच्याही प्रज्ञांनी निर्वाण मांडले. लोकांना समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचे जीवन प्राप्त व्हावे, लोकांना सामाजिक न्यायाचा उपभोग घेता यावा यासाठी दोघांनीही निकराच्या वैचारिक लढाया सुरू केल्या. देव-दैववादी बनणे सोपे आहे. माणूसपण विकसित करीत नेण्याच्या कष्टप्रद प्रक्रियेकडे पाठ फिरवून अंधश्रद्धांमधे लोळत राहणे सोपे आहे. ज्यांना स्वातंत्र्याची भीती वाटते त्यांनी पारतंत्र्याच्या आश्रयाला जाणे सोपे आहे. समाजात असे प्रकार नेहमीच चालत असतात. या सर्व गतानुगतिक आणि बौद्धिक जीवनाच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर बुद्धाने आणि आंबेडकरांनी समाजाला विचाराशी, जिवंत प्रवाही विचाराशी आणि चिकित्सापूर्ण जगण्याशी जोडण्याचे महत्कार्य आपापल्या काळात केले त्याला इतिहासात तोड नाही.

वेदकाळापासूनची प्रतिक्रांती बुद्धाला नकार देत होती. बुद्धाच्या क्रांतीला

या प्रतिक्रांतीचा पराभव करायचा होता. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपुढे वेदकाळापासूनच्या प्रतिक्रांतीचा महाअवरोध उभा होता. बुद्धापुढली प्रतिक्रांती गुंतागुंतीची होतीच पण डॉ. बाबासाहेबांपुढली प्रतिक्रांती पुढल्या हजारो वर्षांनी अधिकच गुंतागुंतीची करून ठेवली होती. गुरुपुढे प्रश्न होतेच पण शिष्यापुढील प्रश्नांची संख्याही वाढली होती आणि त्यांची जटिलताही वाढली होती. याचा अर्थ असा की इतिहासाने बुद्धापुढे अंथरले होते त्या वास्तवापेक्षाही अधिकच भयंकर वास्तव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपुढे अंथरून ठेवले होते. बाबासाहेबांना करावयाची होती ती लढाई आणखी एका संदर्भात बुद्धापेक्षा कठीण होती आणि तो संदर्भ होता भारतीय इतिहासातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक स्थानाचा !

हिंदू कोड बिल, संविधान आणि इतरही मार्गांनी या देशातील कामगार आणि उपेक्षित स्त्रियांच्या मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याला संपूर्ण इतिहासात तोड नाही. बुद्धाने स्त्री मुक्तीचा प्रस्तावही मांडला होता आणि स्त्री स्वातंत्र्याची कितीतरी दारे उघडून दिली होती. बुद्ध म्हणजे स्त्रीअस्मितेच्या प्रस्थापनेची महानांदीच होय यात शंका नाही. बुद्धाचा स्त्रीमुक्तीचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक मूल्यांच्या संदर्भात एका परम उंचीवर नेऊन उभा केला.

माणसालाच जीवनाचे केंद्र मानणारे आणि या परम सौंदर्याच्या उन्नयनासाठी जीव पाखडणारे हे दोघेही क्रांतीनायक कोणत्याही संदर्भात अंधश्रद्ध नव्हते. ते पूर्ण बुद्धिवादी होते. दोघांनीही हातात धागेदोरे बांधले नाहीत. दोघांचीही तर्कावर भिस्त होती. जातीसंस्थेला जाळून टाकण्यासाठी दोघांनीही जिवाचे रान केले. जातीसंस्थेच्या अंतासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी मीमांसा मांडली तिलाही भारताच्या इतिहासात तोड नाही.

हे दोघेही क्रांतीमानव प्रज्ञावंत तर होतेच पण शीलवंतही होते. कोणत्याही मादक पदार्थांना दोघांनीही कधी स्पर्श केला नाही. सर्वच गोरगरिबांविषयी दोघांच्याही मनात उदंड करुणा होती.

आपण माणूसच आहोत हेच दोघांनीही सतत सांगितले. ज्ञानाच्या महत्तेला दोघांच्याही आयुष्यांनी सतत गौरविले. आपल्या अनुयायांना त्यांनी विचारस्वातंत्र्य दिले. मी म्हणतो म्हणून नाही तर सद्‌सद्‌विवेकबुद्धीला पटते म्हणून स्वीकारा असे दोघांनीही सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानाची अप्रतिहतता सांगितली. ज्ञान कुठे आणि कोणापाशीही थांबत नाही हे सांगितले. अधिकाधिक उन्नत अशा सद्‌विचारासाठी त्यांनी दारे सतत उघडी ठेवली.

बुद्धाचा संघ हा एका दृष्टीने लोकशाहीचाच प्रयोग होता. समाजवादाचेही ते नियोजन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्व प्रयोगांचा संविधानाच्या, कायद्याच्या भाषेत आणि शास्त्रीय पद्धतीने विकास केला. राज्यसमाजवादाचे मार्क्सपेक्षा वेगळे पण बुद्धाशी अनुबंध राखणारे प्रारूप त्यांनी दिले. पारमार्थिक, पारलौकिक वा दैवी मूल्यांचा दरारा मोडून काढून ऐतिक पातळीवरील समतेशी आणि बुद्धिवादाशी संबंधित मानवीनैतिकतेचा दोघांनीही पुरस्कार केला.

बुद्धाचा वैचारिक वारसा पुढे नेणारे, त्याचा परमप्रकर्ष करणारे डॉ. आंबेडकर हे बुद्धाचे सर्वश्रेष्ठ वारसदार होत असे म्हटले पाहिजे. मानवी जीवनाला अत्तदीपत्वाने मंडित करणारा आणि सर्वहितैषी मानवी समाजाचा आदर्श बुद्धाने उभा केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या आदर्शाला आज उद्याच्या बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात एक महान अन्वर्थकता प्राप्त करून दिली आणि एका परम पातळीवर या आदर्शाची महत्ता आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रस्थापित केली. एकाच सूर्याच्या दोन बाजू म्हणजे बुद्ध आणि आंबेडकर !

•••



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे यापुढल्या सर्व शतकांचे 'महाबुद्ध' आहेत ही गोष्ट डॉ. यशवंत मनोहरांनी या पुस्तिकेत सांगितली आहे. डॉ. यशवंत मनोहर हे प्रखर बुद्धिवादी विचारवंत साहित्यिक म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. त्यांची या पुस्तिकेतील मीमांसा वाचकांना अंतर्मुख करणारी ठरेल.